भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. केडगाव

| मुदत ठेव | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवसाकरिता | ८ % |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ९ % |
| ९१ दिवस ते ३६५ दिवस | १० % |
| १२ महिने ते १७ महिने | १०.५० % |
| १८ महिन्याच्या पुढे | ११ % |
| मसिक ठेव (संचित मुदत ठेव) | ८% |
| दैनंदिन ठेव (बिंदुसागर ठेव) | २.५०% |
| व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव (द.सा.द.शे) | ५% |

आपल्या विश्वासाची भैरवनाथ पतसंस्था केडगाव, नगरकरांच्या सेवेत घेऊन येत आहे

सुवर्ण कर्ज व ठेव योजना

सर्व ठेवी ज्येष्ठ नागरिक ०.५०% (अर्धा टक्का व्याज) जादा



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. ०९.१२.२०२४ | अंक नं. २३५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



"अपने किचन को मंदिर बनाये,
भोजन नहीं प्रसाद बनाये !"
OSTWAL KITCHENS®
Har Ghar Ke Liye...
१, सिटी सेंटर कॉम्प्लेक्स, मिस्कीन मळा, तारकपूर - गंगा उद्यान रोड, सावेडी, अहमदनगर.
CALL : 98220 67895, 9146 707070
(रविवार बंद) www.ostwalkitchens.com







सचिन भाऊ जाधव
(शिवसेना शहर प्रमुख)
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
नॅशनल जनरेटर
फिरोज अहमद शेख
(उद्योजक)



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# ‘आधार’चे खाजगीकरण रद्द करा अन्यथा मंत्रालयामधून उड्या मारू

राहता – महाराष्ट्र राज्य सरकारने खाजगी कंपनीला ‘आधार’चे काम देण्याचा निर्णय तत्काळ रद्द करावा अन्यथा मंत्रालयामधून उड्या मारू, असा इशारा राज्यातील सेतु चालकांनी शिर्डी येथील अधिवेशनामधून दिला आहे. यावेळी ‘आधार’च्या खाजगीकरणाविरोधात राज्य सरकारच्या निषेधाचा ठराव मांडण्यात आला. या अधिवेशनासाठी संपूर्ण राज्यामधून सेतू चालक उपस्थित होते.

यावेळी सेतू कार्यालयाला पूर्वीप्रमाणे महा ई सेवा केंद्र नाव देण्यात यावे, सेतू कार्यालयामधून जे विविध प्रकारचे दाखले दिले जातात, त्या प्रत्येक दाखल्यामागे सेतू चालकांना १०० रूपये इतके कमिशन देण्यात यावे, राज्यातील सेतू चालकांचा तसेच त्यांच्या कुटुबाचा राज्य शासनामार्फत विमा उतरवण्यात यावा, नविन सेतू कार्यालयाचे वाटप करू नये, आधार केंद्र चालक जे ऑपरेटर आहे, त्यांना ‘ब्लॅक लिस्ट’ करण्याअगोदर नोटिस देण्यात यावी, आधार कार्डचे कमिशन बाकी आहे ते कमिशन तत्काळ मिळावे, सेतू चालकांना ग्रामपंचायत ऑपरेटरप्रमाणे मानधन मिळावे, तसेच आधार किट जमा करणे संदर्भात जी शासनाने नोटिस दिली आहे, त्यासाठी सर्वांनी एक होऊन लढावे, अशा मागण्या सरकारकडे करण्यात आल्या. यावेळी सेतू चालक संघटनेचे राज्य अध्यक्ष श्री.धाबे, विनोद तायडे, उमंग शाहा, श्री. गावडे, सौ. नंदाताई कोठले, जयश्री मॅडम, शैलेंद्र भोईटे उपस्थित होते. अधिवेशन यशस्वीतेसाठी लुकेश शिंदे, कुंदन कोरडे, आनंद दळवी आदींनी परिश्रम घेतले. (छायाचित्र पान २ वर)


साडी खरेदीकरिता..
सर्व प्रकारच्या सहावार/नऊवार
श्रध्दा-टेक्स होलसेल साडी डेपो
शॉप नं.सीएस-३, एके-१ बिल्डींग,आयटीआय, मेन गेटसमोर, अकोलकर हॉस्पिटलजवळ
रविवार बंद
बुरुडगाव रोड, अहिल्यानगर मो : 9822257112



आपके शहर में पहली बार
भारतीय क्राफ्ट उत्सव
३ डिसेंबरपासून सुरु..
खास आकर्षण
लखनवी चिकन सुट ▸ सहारनपुर फर्नीचर
राजस्थानी बांगड्या ▸ राजस्थानी पेंटिंग्स्
बनारसी साड्या ▸ पश्चिम बंगाल साड्या
चंदेरी सिल्क साड्या ▸ बेड कव्हर्स
दिवान सेट ▸ केरळ ज्वेलरी ▸ सतरंजी
मोजडी ▸ फॅन्सी चप्पल ▸ लेदर बॅग्स् ▸ टॉप्स
टी-शर्टस् ▸ कारपेट ▸ पंजाबी सुट
मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स ▸ जयपुरी जुती
ब्लॉक प्रिंट ▸ खुर्जा क्रॉकरी ▸ टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - तांबटकर माळा ग्राउंड पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ : सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत





SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



Career DISHA
२ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA
Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST
CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP
WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769





सर्व प्रकारचे गिझर व लाईट गिझर चॉईससाठी भव्य दालन
GI, CPVC, UPVC, SWR पाईप व फिटिंग, सर्व प्रकारचे पंप, सोलर, सॅनेटरी, गॅस, सॅनिटरी, बाथ फिटिंग.
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahmednagar
8975979999 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE




सेल्फ अॅडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ अॅडेसिव्ह वॉलपेपर,किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईडस्, झेब्रा ब्लॉईडस्,, रोलर ब्लॉईडस्, व्हर्टिकल ब्लॉईडस, कस्टमाईज ब्लॉईडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ, कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टि.वॉल ग्रास

गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## जर तुझा एकांत केव्हा.. गुणगुणाया लागला..

'चंद्रोत्सव' या काव्यभरीत पुस्तकात लेखक प्रवीण दवणे यांनी अद्भूत गझलकार सुरेशजी भटांविषयी भरभरून लिहितात.

भटांची कविता माझ्या आयुष्यात नेमकी केव्हा आली हे सांगता येणार नाही, पण तो क्षण हळूवार असणार. मनाचे आभाळ पूर्णपणाने भरून आल्याखेरीज काही कविता आपला चेहरा दाखवितच नाही मुळी. भटांची कविता कुठल्या तरी जखमी क्षणी अशीच एखाद्या प्रेमळ पिशाचासारखी माझ्या मानगुटीवर बसली.

भटांच्या कविता म्हणजे विविध प्रकारच्या जखमाच आहेत. पण ज्या जखमेत गुलाबी रूपाची गुदमरलेली हाक केव्हाची दडली आहे, अशा जखमांबद्दल कुतुहल वाटू लागते.

**उभा जन्म झाला चिता एक एक क्षण ज्वाला ।**

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

**सुन्न मनाच्या स्मशानी मला भडाग्नी मी दिला ।।**



सुरेश भटांची प्रेमकविता आज तरुण वर्गात अतिशय लोकप्रिय आहे अन् प्रौढांना ती बेचैन करणारी आहे. तारुण्याचे निसटलेले क्षण, सुगंधी आठवणींच्या अत्तराचा सुगंध त्यातील हुरहुरीसकट व्यक्त केला जातो.

सुरेश भट हा माणसांचा कवी आहे. माणसांच्या आनंदाचे, दुःखाचे सर्व सोहळे त्यांनी अनुभवले, ते व्यक्त होतात व नेमके तसेच रंग ज्याच्या नशिबात आले त्याला 'आपणच' येथे सापडलो असे वाटत राहते. सृजनशील व भावनाप्रधान मनं भटांच्याच ओळी

**जर तुझा एकांत केव्हा गुणगुणाया लागला ।**
**शोध तू हृदयात माझी स्पंदने मिळतात का?।।**

# घरात गळफास घेत तरुणाची आत्महत्या

नगर - राहते घरात सिलिंग फॅन ला मफलरच्या सहाय्याने गळफास घेत तरुणाने आत्महत्या केल्याची घटना नगर शहरातील गौरी घुमट येथील कल्याणमवाडा येथे रविवारी (दि.८) पहाटे १.३० च्या सुमारास घडली. निखील नरेंद्र चिप्पा (वय २७, रा. कल्याणमवाडा, गौरी घुमट) असे या तरुणाचे नाव आहे.



निखिल चिप्पा

निखील चिप्पा याने अज्ञात कारणातून रविवारी (दि.८) पहाटे १.३० च्या सुमारास राहते घरात सिलिंग फॅन ला मफलरच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब त्याच्या कुटुंबियांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी त्यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

याबाबतच्या खबरे वरून कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत निखील याच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई आहे.

# स्टेशन रस्त्यावर अवतरलेली अतिक्रमणे महापालिकेच्या पथकाने पुन्हा हटविली

नगर - शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सातत्याने सुरू असून, महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने सोमवारी (दि. ९) शहरातील स्टेशन रस्त्यावर माळीवाड्यातील रस्ते अतिक्रमणमुक्त केले आहेत. या कारवाईत पथकाने अतिक्रमणाचे साहित्य जप्त केले. अतिक्रमणे हटविल्यामुळे मार्केट यार्ड चौक ते स्वस्तिक चौकापर्यंतचा रस्ता मोकळा झाला आहे.





माळीवाड्यातील बसस्थानक ते स्वस्तिक चौक परिसरात स्टेशन रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करत अतिक्रमणधारकांचे साहित्य जप्त करताना महापालिकेचे अधिकारी आणि अतिकमण विरोधी पथक. (छाया - बबलू शेख)

### कारवाईत टपऱ्या, हातगाड्यांसह साहित्य जप्त, रस्त्याने घेतला मोकळा श्वास

महापालिकेच्यावतीने सातत्याने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू आहे. स्टेशन रस्त्यावर उड्डाणपुलाखाली यापूर्वीही अतिक्रमणे हटविण्यात आली होती. तथापि कारवाई केल्यानंतरही पुन्हा अतिक्रमणधारकांनी आपल्या टपऱ्या, दुकाने रस्त्याच्या बाजूने थाटली होती. त्यामुळे महापालिकेच्या प्रभाग समिती २ आणि ४ च्या अधिकाऱ्यांनी सोमवारी (दि. ९) संयुक्त पद्धतीने कारवाईची मोहीम हाती घेतली. क्षेत्रिय अधिकारी नितीन इंगळे, अमोल कोतकर, अनिल आढाव यांच्या सूचनेनुसार पथकाने स्वस्तिक चौक, पुणे बसस्थानक परिसर, इम्पिरिअल चौक, भूमिअभिलेख कार्यालय परिसरासह स्टेशन रस्त्यावर असणाऱ्या हातगाड्या, टपऱ्या, वडापाव, चहा, पानाच्या टपऱ्या, टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल कंपन्यांनी उभारलेले स्टॉल उद्ध्वस्त करत सदरचे साहित्य वाहनात टाकून जप्त केले आहे.

या कारवाईच्या मोहिमेमुळे सदरचा रस्ता पूर्णतः मोकळा झाला असून, वाहतुकीला येणारा अडथळा दूर झाला आहे.

## विष्णू आडेप यांचे आकस्मिक निधन

नगर - येथील रहिवासी पद्मशाली वधु-वर मंडळाचे मार्गदर्शक विष्णू गंगाराम आडेप (वय ७५, रा.आदर्श कॉलनी, कल्याण रोड, अ.नगर) यांचे ८ डिसेंबर रोजी आकस्मिक निधन झाले.



त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कुमार, रवि आडेप यांचे ते वडील होत. ते वाडियापार्क येथील जी गणेश टेलर्सचे मालक होत.

## केडगावमध्ये पूर्ववैमनस्यातून दोन गटात हाणामारी; गुन्हा दाखल

नगर - केडगाव उपनगरातील शास्त्रीनगर भागात पूर्ववैमनस्यातून दोन गटात वाद होवून हाणामारी झाल्याची घटना शनिवारी (दि.७) सायंकाळी घडली. या प्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात एकावर पुनरावृत्ती गुन्ह्यांना प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून त्याला अटक केली आहे. मनोज सुरेश शिरसाठ (रा. शास्त्रीनगर, केडगाव) असे त्याचे नाव आहे.

याबाबत प्रेम जितेंद्र साठे (वय १९, रा. समतानगर, केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मनोज शिरसाठ याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रेम शनिवारी सायंकाळी त्यांच्या राहत्या घरासमोर असताना मनोज तेथे आला. त्याने पूर्ववैमनस्यातून प्रेमचा लहान भाऊ प्रतीक साठे यांना शिवीगाळ करून कुऱ्हाडीच्या दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. प्रेम त्यांना समजावून सांगण्यासाठी गेले असता त्यांना देखील मारहाण केली. त्यांच्या बहिणीला शिवीगाळ केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दुसरी फिर्याद मनोज सुरेश शिरसाठ (वय ३४, रा. शास्त्रीनगर, केडगाव) यांनी दिली असून त्यावरून प्रेम जितेंद्र साठे (रा. समतानगर, केडगाव) व दोन ते तीन अनोळखी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोज हे शनिवारी सायंकाळी त्यांच्या राहत्या घरासमोर उभे असताना प्रेम हा त्याच्यासोबत दोन ते तीन अनोळखी इसम घेवून आला. त्यांनी पूर्ववैमनस्यातून शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. प्रेमने लोखंडी कोयत्याने मारहाण करून जखमी केले. 'तु जर परत माझ्या नादी लागला तर तुला मी जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## वाहनाच्या शोरूम मध्ये कामगारानेच केली चोरी

नगर - चारचाकी वाहनाच्या शोरूममध्ये काम करणाऱ्या कामगाराने शोरूमच्या गोडावून मधून २५ हजार ३३० रुपये किंमतीचे वाहनांचे स्पेअरपार्ट चोरून नेल्याची घटना नवनागापूर येथील कांकरिया कार शोरूम मध्ये उघडकीस आली आहे. याबाबत शोरूमचे व्यवस्थापक अजय दत्तात्रय नगरकर (रा. भिस्तबाग, सावेडी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शोरूम मध्ये काम करणारा करण नाना शिरवाळे (रा. विळद, ता.नगर) याने मारुती कारचे २५ हजार ३३० रुपये किंमतीचे स्पेअरपार्ट चोरून नेले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित आरोपी करण शिरवाळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## सौ. मीना पवार यांचे अल्प आजाराने निधन

नगर - नगर येथील वनराई कॉलनी राज हॉटेलच्या मागे नवनागापूर येथील रहिवासी सौ. मीना अशोक पवार (वय ५०) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्या धार्मिक वृत्तीच्या व मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर नवनागापूर येथील स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, सासरे, दोन मुली, एक मुलगा, जावई, दीर व नातवंडे असा परिवार आहे



## नारायण भैरी यांचे आकस्मिक निधन

नगर - पद्मशाली वधू-वर मंडळाचे मार्गदर्शक, मार्कंडेय ग्रुपचे सदस्य नारायण भैरी (वय ८०, रा.निलगिरी अपार्टमेंट, तोफखाना, अ.नगर) यांचे ८ डिसेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.



## रमेश नाईक यांचे वृद्धापकाळाने निधन

छत्रपती संभाजीनगर - म.शि.प्र मंडळाचे माजी प्रशासकीय अधिकारी मेजर रमेश दिनानाथराव नाईक (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने ७ डिसेंबर रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्यावर ८ डिसेंबर रोजी प्रतापनगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, दोन मुली जावई, नातवंडे असा परिवार आहे. देवगिरी महाविद्यालयातील डॉ.मनिषा नाईक जोशी यांचे ते वडील असून प्रा.शुभांगी नाईक कुलकर्णी तसेच निवृत्त तंत्र शिक्षण संचालक डॉ.महेश शिवणकर यांचे ते सासरे होत.



# बुरुडगाव रोडवरील तीन दुकानांतून चोरी

### २ मेडिकलसह एका किराणा दुकानाचा समावेश, रोकड सह साहित्याची चोरी

नगर - शहरातील बुरूडगाव रोड परिसरात चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घालत २ मेडिकल, १ किराणा दुकान एकाच रात्रीत फोडून चोरी केली आहे. शुक्रवारी (दि.६) रात्री १० ते शनिवारी (दि.७) सकाळी ७ या कालावधीत या चोऱ्या झाल्या आहेत.





याबाबत विशाल दगडुलाल गांधी (वय ४९, रा- राजज्योती नगर, बुरुडगावरोड) यांनी शनिवारी (दि.७) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी गांधी यांचे बुरुडगाव रोडवर नम्रता मेडिकल नावाचे दुकान आहे. गांधी यांनी शुक्रवारी रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून ते घरी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना शेजारील दुकानदार गणेश जाधव यांनी फोन करून सांगितले की तुमच्या दुकानाचे शटर उघडे दिसत असून चोरी झाल्याचे दिसत आहे. असे सांगितल्याने गांधी यांनी लगेच मेडिकलमध्ये जाऊन पाहणी केली असता लोखंडी शटरला लावलेले कुलूप कोयंडा कशाचे तरी सहाय्याने कट केलेला दिसला.

तसेच कुलूप बाजूला पडलेले होते त्यानंतर गांधी यांनी मेडिकलमध्ये पाहणी केली असता मेडिकल मधील सामानाची उचकापाचक झालेली दिसली. मेडिकल काउंटर टेबल मधील लॉक केलेले ड्रॉवर उघडे दिसले. त्यात ठेवलेली रोकड चोरीस गेल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

तसेच गांधी यांच्या परिचयाचे असलेले अशोक बन्सीलाल गांधी (रा. सारसनगर) यांचे आनंद प्रोव्हीजन किराणा दुकान आणि वर्षा राजेंद्र जैस्वाल (रा. माणिक नगर) यांच्या तारा मेडिकल मध्येही चोरी झाल्याचे त्यांना समजले असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी विशाल गांधी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ), ३३१(३), ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# तेलीखुंट येथील मोबाईल शॉपी फोडून रोकड व मोबाईलची चोरी

### सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळले तोंडाला मास्क बांधलेले २ चोरटे

नगर - शहरातील तेलीखुंट येथील न्यु श्रीधर इंटरप्रायझेस मोबाईल शॉपी नावाचे दुकान चोरट्यांनी फोडले. ६ हजाराची रोकड व ९ मोबाईल असा १लाख ५९ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. शनिवारी (दि.७) सकाळी पावणे नऊच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.



तेलीखुंट येथील चोरट्यांनी फोडलेली मोबाईल शॉपी छायाचित्रात दिसत आहे.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सुधीर सुरेश गोफणे (वय ४४, रा. अष्टविनायक कॉलनी, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांचे तेलीखुंट येथे न्यु श्रीधर इंटरप्रायझेस मोबाईल शॉपी नावाचे दुकान आहे. ते त्यांनी शुक्रवारी रात्री नऊच्या सुमारास शटरला कुलूप लावून बंद केले होते. दुसर्या दिवशी शनिवारी सकाळी पावणे नऊच्या सुमारास त्यांना त्यांचा भाऊ आशिष गोफणे (रा. गुलमोहर रस्ता, सावेडी) यांनी फोन करून आपल्या दुकानचे शटर अर्धवट उघडे असून शक्यतो दुकानात चोरी झाली आहे, असे कळविले. सुधीर यांनी मोबाईल शॉपीमध्ये जावून पाहिले असता शटर अर्धवट उघडे व कुलूप तुटलेले दिसून आले. दरम्यान, सुधीर यांनी चोरीची माहिती तोफखाना पोलिसांना दिली. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी पाहणी केली असता दुकानातील ६ हजाराची रोकड व विविध कंपन्यांचे ९ मोबाईल असा १ लाख ५९ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे समोर आले.

यानंतर त्यांनी तोफखाना पोलिसांशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस घटनास्थळी दाखल झाले. व घटनास्थळाची पाहणी केली. शटर उचकटलेली पहार चोरट्यांनी तेथेच जिन्यात पायरीवर टाकलेली आढळून आली. पोलिसांनी आत जाऊन पाहणी केली व घटनेची माहिती घेतली. त्यानंतर फिंगर प्रिंट ब्युरो पथकास पाचारण केले. या पथकाने येऊन दुकानात हाताच्या ठशाचे पाहणी करून चोरट्यांचे ठसे मिळवले. तसेच तेथील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता फुटेज मध्ये तोंडाला मास्क बांधून दोन चोरट्यांनी येऊन शटरच्या दरवाजात शटर तोडून आत प्रवेश करुन चोरी केल्याचे दिसून आले. या प्रकरणी दोघा चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पद्माकर दरंदले यांचे अल्प आजाराने निधन

सोनई - नेवासा तालुक्यातील लांडेवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन पद्माकर त्रिंबक दरंदले (वय ८३) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पाठीमागे, दोन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे. लांडेवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंच संजय दरंदले तर शेतकरी बबन दरंदले यांचे ते वडील होते. तसेच माजी खासदार यशवंतराव गडाख यांचे ते निष्ठावंत सहकारी होते.



# भोसले आखाड्यात महिलेच्या गळ्यातील दागिने ओरबाडून पळविले

### २ चोरटे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद, पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरु

नगर - रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याच्या २ चेन काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर आलेल्या दोघा चोरट्यांनी हिसका मारून तोडून नेल्याची घटना शहरातील बुरूडगाव रोड, भोसले आखाडा परिसरातील पवार चाळ येथे रविवारी (दि.८) सायंकाळी ७ च्या सुमारास घडली.

याबाबत आरती संजीव घुबे (रा.मारुती मंदिरासमोर, संग्राम कॉलनी, भोसले आखाडा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या रविवारी (दि.८) सायंकाळी ७ च्या सुमारास भोसले आखाडा परिसरातील पवार चाळ येथे रस्त्याने पायी घराकडे जात असताना त्यांच्या पाठीमागून काळ्या रंगाच्या मोटारसायकल वर आलेल्या दोघांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीची २ सोन्याची चेन हिसका मारून तोडल्या व तेथून भरधाव वेगात दोघे निघून गेले.

या घटनेनंतर फिर्यादी यांनी आरडाओरडा केला. त्यामुळे नागरिक जमा झाले, पण तो पर्यंत चोरटे पसार झाले होते. काही नागरिकांनी पोलिसांना फोन केला. पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जावून पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. काही ठिकाणी चोरटे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले असून पोलिसांनी ते फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले आहे. याबाबत अनोळखी चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## प्रताप देवरे (सर) यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील श्रीरामपूर न.पा. (गोंधवणीगांव) शाळा क्र.३ चे माजी मुख्याध्यापक, बौद्ध सेवा संघ व स्नेह ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्रताप देवराम देवरे (सर) (वय ६६) यांचे ७ डिसेंबर रोजी सायं.४:४५ वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पुतणे, सून असा परिवार आहे. जयेश देवरे व गौरव देवरे यांचे वडील, कैलास अंबादास देवरे यांचे चुलते होत.









शिर्डी येथे राज्यातील सेतु चालकांचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनासाठी संपूर्ण राज्यामधून सेतु चालक उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी तुळशीचा चहा

तुळशीला केवळ धार्मिक महत्त्व नाही, तर ते आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. रोज एक कप तुळशीचा चहा प्यायल्याने तुम्हाला अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. तुळशीमध्ये अँटिऑक्सिडेंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे तुमची प्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करतात.

सर्दी, खोकला, ताप आणि इतर संक्रमणांपासून संरक्षण करण्यासाठी हे उपयुक्त आहे. तुळशीचा चहा प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

## पाककला

### गाजर बर्फी

**साहित्य :** किसलेले गाजर १ किलो, खवा मावा २५० ग्रॅम, साखर २०० ग्रॅम, तूप २ चमचे, वेलची पूड, बदाम, काजू, पिस्ता, दूध १ कप

**कृती :** सर्वात आधी एका पातेल्यात तूप टाकून हलके गरम करावे. त्यात किसलेले गाजर घालून मंद आचेवर परतवून घ्यावे. गाजर मऊ होईपर्यंत आणि पाणी कोरडे होईपर्यंत सुमारे १०-१५ मिनिटे शिजवून घ्यावे. आता यामध्ये दूध घालावे. व ढवळत राहावे जेणेकरून दूध गाजरात चांगले मिसळून घट्ट होईल. दूध पूर्णपणे आटल्यानंतर त्यात खवा आणि साखर घालावी.

आता साखर विरघल्यानंतर आता या मिश्रणात वेलची पूड आणि ड्रायफ्रूट्स घालून मिक्स करावे. आता एका प्लेटला तूप लावून घ्यावे व हे मिश्रण सारखे पारतावे. आता वरून परत ड्रायफ्रुट्सने सजवावे. आता हे मिश्रण थंड झाल्यानंतर सुरीने वड्या कापून घ्याव्या.

## वास्तू

### सुख समृद्धीसाठी

जर तुम्ही स्वयंपाकघरात भाजी ठेवत असाल तर उत्तर-पूर्व दिशा सर्वात शुभ मानली जाते. अनेकदा असे घडते की भाज्या घरी आणल्यानंतर त्या जमिनीवर ठेवल्या जातात, परंतु हे टाळले पाहिजे. यामुळे वास्तु दोष होतो. त्यामुळे तुम्ही टेबलावर भाज्या ठेवा. यामुळे नकारात्मकता दूर होऊन घरात सुख-समृद्धी येऊ शकते.

## सल्ला

टी ट्री तेल हे एक आवश्यक तेल आहे, जे तुम्ही तुमच्या त्वचेची आणि केसांची निगा राखू शकता.

## सौंदर्य

मुलतानी मातीत काकडीचा रस मिसळून पेस्ट तयार करून चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटे सुकल्यावर धुऊन टाका. याने त्वचा मऊ होईल.

**संकलक** : **ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. १० डिसेंबर २०२४**

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, उ.भा. १३।३०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मित्र आपणास मदत करतील.

**वृषभ** : मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील.

**मिथुन** : व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. मित्रांची मदत मिळेल.

**कर्क** : घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल.

**सिंह** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर उंचावेल.

**कन्या** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापारात नफा होईल.

**तुळ** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल.

**वृश्चिक** : शत्रू प्रभावहीन पडतील. व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**धनु** : बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील.

**मकर** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करुन देणारा ठरेल.

**कुंभ** : भविष्यात मान-सन्मानात वाढ.

**मीन** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**संकलक** : **ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बायको** - (बाथरूम मधून लाडिक आवाजात) अहो मी साबण लावलाय जरा तुमच्या मजबूत हातानी चोळून देता का?

**नवरा** - आलो आलो आलो आलोच


**बायको** - अहो ह्या बादलीभर कपड्यांना साबण लावून ठेवलाय. नीट रगडून धुवा. मला स्वयंपाकाच काम आहे मी जाते!!!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* कतार देशास स्वातंत्र्य कधी मिळाले? - ३ सप्टेंबर १९७१
* 'अरेबिया फेलीन्स' हे कोणत्या राष्ट्रास संबोधीले जाते? - रोमन
* आशियातील सर्वात जास्त लोकसंख्या कोणत्या देशाची आहे? - चीन
* आशियातील सर्वात कमी लोकसंख्या कोणत्या देशाची आहे? - मालदीव

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६७ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७०६६ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) सकळ; सर्व; सारे ४) फेरी; येरझार; चक्कर ६) सायंकाळ; संध्याकाळ ८) घन; निबिड; गर्द ९) घाण; विष्ठा १०) पांघरण्याचे एक उंची वस्त्र; शाल ११) बसण्यासाठीचे एक छोटे वस्त्र; आसन १३) पायाने केलेला प्रहार १६) पलीकडे; झाडाखालचा ओटा १८) सूर्योदयापूर्वीचा काही काळ; प्रभात २०) या ऋषीने स्वर्गातून पृथ्वीवर गंगा आणली असे म्हटले जाते २२) मार्ग; पथ; रस्ता २३) अलगूज; मुरली; बासरी २४) व्यर्थ; वायफळ २५) धरणी; पृथ्वी; रसा २६) अपशकुन

**उभे शब्द :-** १) कामासहित; इच्छा बाळगणारा; इच्छा धरून केलेले २) आशय; हेतू; स्वार्थ ३) थर; दर्जा; पापुद्रा ४) खेळणारा; आनंदी; खेळाडू ५) डोंगरातील नागमोडी रस्ता; नदीच्या काठी पायऱ्या बांधून केलेली रचना ७) वेशीवरचा पहारेकरी ८) नवरा; पती; स्वामी १२) उंच सखल नसलेले; समतल १४) आनंदाने किंवा संतापाने ओरडणे किंवा तसा केलेला हावभाव; नाचणे १५) नियम म्हटला की हा आलाच; नियमाला बाधक गोष्ट १७) एक क्षुद्र जीव; पिपीलिका १९) बाजार; मंडई २०) एक देवी २१) गेलेला; मार्गस्थ झालेला २३) बेकरीत तयार होणारा एक खाद्यपदार्थ

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुम्हाला ज्या विषयाची माहिती आहे त्याविषयी कमी बोला, आणि ज्या विषयाची माहिती नाही त्या विषयी मौन पाळा.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### सिझेरियन प्रसुती का करतात?

ओटीपोटात आणि गर्भाशयात चीरे वापरून, एक स्त्री सिझेरियन सेक्शन (सी-सेक्शन) द्वारे बाळाला जन्म देते. सिझेरियन डिलिव्हरी म्हणजे काय? तुमच्या आरोग्यासाठी किंवा तुमच्या मुलाच्या आरोग्यासाठी सिझेरियन विभागाची आवश्यकता असू शकते, सामान्यत: सी-सेक्शन म्हणून ओळखले जाते. या उपचारामध्ये बाळाला जन्म देण्यासाठी ओटीपोटात आणि गर्भाशयात शस्त्रक्रियेने चीर टाकणे समाविष्ट आहे. जेव्हा वैद्यकीय कारणास्तव सिझेरियन जन्माची गरज भासते, तेव्हा तुम्ही त्याची वेळेपूर्वी व्यवस्था करू शकता किंवा विशिष्ट गुंतागुंत उद्भवल्यास तुमच्या प्रसूतीदरम्यान ते उत्स्फूर्तपणे होऊ शकते.

ज्या बाळाचे डोके किंवा शरीर एकतर खूप मोठे आहे किंवा आईचे ओटीपोट खूपच लहान आहे ते केसच्या आधारावर सामान्य आकाराच्या बाळाला सुरक्षितपणे जन्म देऊ शकत नाही. पूर्वीच्या सिझेरियननंतर योनीमार्गे जन्म देणे शक्य असले तरी, अनेक स्त्रियांसाठी हा पर्याय नाही. अगोदरच्या सिझेरियनमध्ये वापरल्या गेलेल्या गर्भाशयाच्या चीराचा तसेच गर्भाशयाच्या फाटण्याचा धोका या दोन्ही गोष्टी सिझेरियनच्या आवश्यकतेवर परिणाम करू शकतात.

जरी जुळी मुले बहुतेक वेळा योनीतून जन्माला येतात, तरीही दोन किंवा अधिक मुलांना जन्म देण्यासाठी सिझेरियन विभागाची आवश्यकता असू शकते. गर्भाशयाच्या भिंतीमध्ये प्लेसेंटा खूप कमी असल्यामुळे गर्भाशयाच्या मुखातून बाळाला बाहेर पडता येत नाही. बाळ गर्भाशयात आडवे पडलेले असते. जेव्हा एखाद्या महिलेला ही स्थिती असते तेव्हा सिझेरियन जन्माचा उपयोग केला जातो. जेव्हा गर्भाशय ग्रीवा पसरण्यास सुरुवात होते परंतु स्त्री पूर्णपणे पसरण्याआधी थांबते किंवा बाळाची जन्म कालव्यात प्रगती होणे थांबते तेव्हा हा सिंड्रोम होतो. योनीमार्गे प्रसूतीचा पर्याय नसल्यास, सी-सेक्शन शस्त्रक्रियेद्वारे गर्भाची प्रसूती करते. तुमचे सिझेरियन होत असल्यास, तुम्ही त्याची वेळेपूर्वी व्यवस्था करू शकता.

## साधू आणि चोर

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. गावातील मंदिरात देव शर्मा नावाचा एक प्रतिष्ठित साधू राहत होते. गावातील लोक त्यांचा आदर करायचे. साधूला त्यांच्या भक्तांकडून विविध प्रकारचे कपडे, भेटवस्तू, खाद्यपदार्थ आणि पैसे दान म्हणून मिळायचे. ते सर्व विकून साधूने भरपूर पैसा जमा केले होते.

साधू आपले पैसे नेहमी एका झोळीमध्ये ठेवायचे. त्याच गावात एक चोर देखील राहत होता. त्या चोराची नजर साधूच्या पैशांवर होती. चोर नेहमी साधूचा पाठलाग करत असे, परंतु साधूने आपली पैशाने भरलेली झोळी कधीही स्वत:पासून दूर ठेवली नाही त्यामुळे चोराला ती झोळी चोरता आली नाही. एक दिवस चोराने वेष धारण केले. व साधूकडे गेला. त्याने साधूला विनंती केली की त्याला ज्ञान मिळवायचे आहे म्हणून मला शिष्य म्हणून स्वीकारावे. यावर साधूने त्या वेष धारण केलेल्या चोरावर विश्वास ठेवला आणि त्याला आपले शिष्य बनवले.

आता चोर मंदिराच्या साफसफाईसह इतर सर्व कामे करत असे आणि चोराने साधूची चांगली सेवा केली आणि लवकरच साधूचा विश्वास संपादन केला. एके दिवशी जवळच्या गावात साधूला एका कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले, साधूने ते आमंत्रण स्वीकारले आणि ठरलेल्या दिवशी साधू आपल्या शिष्यासह कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी निघाले. वाटेत एक नदी लागली आणि साधूंना स्नान करण्याची इच्छा झाली. साधूने झोळी नदीच्या काठावर ठेवली आणि शिष्याला त्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले. व साधू स्नान करण्यासाठी नदीमध्ये उतरले. चोर अनेक दिवसांपासून या क्षणाची वाट पाहत होता. साधू नदीत गेल्याचे पाहून त्याने पैशांनी भरलेली झोळी उचलली व पळून गेला. बाहेर आल्यावर साधूने पहिले की, झोळी आणि शिष्य दिसत नाही आहे तेव्हा त्यांना सर्व प्रकार समजला व त्यांना त्या चोरावर विश्वास ठेवल्याचा पश्चाताप झाला.

तात्पर्य : कोणाच्याही गोड बोलण्यावर कधीही विश्वास ठेवू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



### प्रस्तावना

पर लगाया गया था और 'रोज आफ. पीस' के नाम मशहूर था, लेकिन वह पौधा सूख गया था और विशेषज्ञों की राय में फूल लगना मुश्किल था। डॉ म्यूलर ने महाराज जी से कहा, कोई सूरत हो सकती है कि यह पौधा फूले ? संत जी ने उत्तर दिया कि जहाँ इंसान की कोशिश सफल नहीं होती, वहाँ प्रार्थना कारगर हो सकती है। उन्होंने गुलाब के उस पौधे के लिए प्रार्थना की। १९८८ ई. के चौथे दौरे पर जब संत जी न्यूयार्क पहुँचे तो डॉ म्यूलर की सैकेट्री ने गुलाब के पौधे की फोटो दिखाई और कहा, यह वही पौधा है जिसमें आप की प्रार्थना से फूल लगे हैं।

सात दशकों में फैली हुई संत जी की साफ-सुथरी और पवित्र ज़िन्दगी ३० मई, १९८९ ई. की सुबह होते ही इस लोक से उस लोक के सफर की आखिरी मंज़िल में प्रवेश कर गयी। और इस तरह उनका अमर और चिरस्थायी जीवन, एक न मिटाया जा सकने वाला सत्य बन गया। उनकी जीवनी लिखने वाले हरीशचंद्र चड्ढा ने उनके अंतिम क्षणों का वर्णन इस प्रकार किया है :

विदाई की रात कोई काम नहीं हुआ, फिर हुज़ूर महाराज ने अपने समस्त कार्यकर्ताओं और सेवादारों का शुक्रिया अदा किया। रात ढाई बजे अमरीका से 'सत्-संदेश' के एडिटर, जे. लिंक्समैन और उनकी पत्नी, रिक्की लिंक्समैन का टेलीफोन आया। महाराज दर्शनसिंह जी ने अपने निबंध मेरा नज़रिए शायरी (शायरी पर मेरा दृष्टिकोण) के अंग्रेज़ी अनुवाद के आखिरी हिस्से में तब्दीली की और अपनी आखिरी पुस्तक के नाम के बारे में बताया था। जे. लिंक्समॅन ने निबंध में तब्दीली के बारे में पूछा, तो उन्होंने कहा था, मैंने इस सम्बन्ध में तुम्हें लिखित निर्देश भेज दिये हैं। वह निर्देश जे. लिंक्समैन ने दिल्ली आकर पढ़ा जिसके अनुसार अपने दृष्टिकोण के बारे में जहाँ हुज़ूर महाराज ने लिखा था, जिन आदर्शों का आज तक प्रचार करता रहा, उन्हें आगे भी जारी रखने का अहद (संकल्प) है। उसे महाराज जी ने यूँ बदल दिया था, ज़िन्दगी का समुन्दर अथाह है, सिर्फ ज़िन्दगी इतनी मुख़्तसर (थोड़ी) है।

इस अन्तिम निर्देश में महाराज जी ने अति विनम्रता और दीनता के भाव से विदाई ली और आशीर्वाद देते हुए कहा, ज्योति की धारा आगे चलकर और बढ़ेगी।

एक शे'र में उन्होंने इसे यूँ कहा है :

गिला करेंगे न अब मेरे बार के रहरौ ।  
कि उनको राहे मुहब्बत में  
रौशनी ना मिली ।।

संत दर्शनसिंह जी महाराज की शायरी का केंद्र सूफ़ियाना चिन्तन और विचार है। उन्होंने सूफ़ीवाद के साहित्य का गहराई से अध्ययन किया। और अपनी शायरी को अध्ययन से प्राप्त ज्ञान की अभिव्यक्ति का माध्यम बनाया है। दर्शन के काव्य, साहित्य के उद्धरण और हवाले महत्त्व का स्थान रखते हैं। उन्होंने अंग्रेज़ी, फारसी और हिन्दी और पंजाबी में भी कविताएँ लिखी हैं, लेकिन उनके काव्य चिन्तन का वास्तविक आधार उर्दू है। उनका पूरा साहित्य आध्यात्मिक शायरी का दर्पण है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

जब मन का बल टूटता है तो शरीर का बल भी टूट जाता है। मन मजबूत है तो शरीर भी मजबूत । मन कमजोर तो शरीर की शक्तिया भी कम होने लगती हैं। जब शरीर और मन शक्तिशाली हो तो हम जो चाहे पा सकते हैं। अगर हम भोजन अच्छा करते हैं, सैर आदि करते हैं, तो शरीर शक्तिशाली बन सकता है। परंतु मन अगर कमजोर हैं तो भोजन चाहे कितना अच्छा हो, वह शरीर को भी कमजोर कर देता है। इसलिए मन को भी शक्तिशाली बनाएं। जीवन में राजयोग को अपनाएं। राजयोग से मन नियन्त्रण में रहता है और शरीर शक्तिशाली बनता है। अच्छे विचार चलाने का सब से आसान तरीका है अव्यक्त मुरली या कोई दूसरी सकारात्मक पुस्तकें बार बार पढ़ें। जब भी कोई नकारात्मक विचार आये किसी सकारात्मक पुस्तक की २-४ लाइने पढ़ लें। दूसरों के प्रति अच्छी भावना रखें। मन विकल्पों में तब उलझता जब उस का साथ देता है। चलो कर लो देखा जाएगा। एक बार कर लूं। यह अज्ञानता है। ऐसे विचार तुरंत दूर कर दो। जहां जहां मन जाए, वहां परमात्मा को बिंदू रूप में देखें या ईष्ट को देखें और कहें आप शांति के सागर हैं। ऐसा करने से मन पर बुरी चीजो का असर नहीं होगा। हमारा समय नष्ट नहीं होगा और हम अच्छे कार्य कर सकेंगे। समय प्रबन्धन और मन (ळीं)

इस समय संसार के अधिकतर लोग निराशा से जूझ रहे हैं। निराशा से समय नष्ट होता है। जिस पल निराशा आए तुरंत सोचो कुछ गलत सोचा है। निराशा से बचने के लिए तुरंत उत्साह का संकल्प पैदा करो। यह उत्साह का संकल्प तुम्हे ही करना है। कोई दूसरा तुम्हे उत्साह नहीं देगा। किसी से उत्साह की उमीद भी नहीं करनी। तुरंत स्फूर्तिदायक विचारों से मन को पोषित करें। महापुरुषों की शिक्षाएं या शिव बाबा की मुरली पढ़ें। उत्साह वर्धक विचार दोहराएं। मन पर तरस न खाएं। कठोरता से उस में अच्छे विचार चलाएं। बस पढ़ते जाओ, चाहे याद रहे या न रहे, समझ आये चाहे न आए। मन कितना ही पीछे खींचे, व्यर्थ का गिड़गिड़ाये, लाख हाथ पांव मारे, उस पर तरस न खाएं। कुछ भी हो जाए ईश्वरीय क्लास में जाना ही है। पांच मिनट जरूर जाना है। नेमी नाथ बनना है।

चाहे कितना भी कोई विरोधी हो, क्लास में आना नहीं छोड़ना, मंदिर जाना नहीं छोड़ना। गुरुद्वारा, गिरजाघर जाना नहीं छोड़ना। जहां भी आप की आस्था है वहां जाना है। ऐसा करते रहने से आप विजय की ओर बढ़ने लगेंगे। संसार संबन्धी विचार राजोगुणी या तमोगुणी होते हैं। आत्मा, परमात्मा और विश्व कल्याण के विचार सतोगुणी होते हैं। ऐसे विचारों से समय सफल होता है। सदा सतोगुणी विचार करने से मन में शांति रहती है। यदि जीवन में दुःख, कष्ट, चिंता, कोई समस्या है, कोई रोग हैं, कोई कड़वाहट है, कोई निराशा है, तो इस का सीधा सा अर्थ है कि आप के विचार नकारात्मक हैं और आप का अमूल्य समय नष्ट हो रहा है। समय प्रबन्धन और मन बोझ विपत्तियां बोझ समझ कर किया गया कार्य सदा विपात्तियां ही पैदा करता है। विचार बीज है। यदि विचार ठीक ढंग से बोया और पाला पोसा जाए तो हमें सफलता मिलती है। व्यक्ति सोचना कुछ चाहता है परंतु सोचने कुछ और लग जाता है। यही अशांति का कारण है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

भगवद्गीता हा हिंदू धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. जीवनात येणाऱ्या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करून त्यातून मार्ग कसा काढायचा, याचे ज्ञान आपल्याला भगवद्गीतेतून मिळते होऊन; भविष्यात जीवनाच्या वाटचालीमध्ये याचा उपयाग होत ज्ञान आपल्याला भगवद्गीतेतून मिळते व त्याचे बाळावर संस्कार होऊन; भविष्यात जीवनाच्या वाटचालींमध्ये याचा उपयोग होतो.

**२) ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महत्त्व :**

मनुष्याला जीवन जगताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, भय, या वाईट विचारांपासून परावृत्त होण्यासाठी ज्ञानेश्वरीचा उपयोग होतो. ज्ञानेश्वरांनी लिहिलेले पसायदानाचे महत्त्व देखील मोठे आहे.

'जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो' असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मनातला दुष्टपणा किंवा वाईट विचार नाहीसा होऊन मनामध्ये सकारात्मक विचार निर्माण होऊन आपल्या हातून चांगले कार्य घडावे.

**भूतां परस्परें जडो, मैत्र जीवांचे**  
**वर्षत सकळ मंगळी। ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।**  
**अनवरत भूमंडळी। भेट तू भूता।।**

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, आपले सर्वांचे इतरांशी मैत्रीपूर्ण संबंध असावेत. इतरांबद्दल वाईट विचार मनात आणू नये. एकमेकांबद्दल चांगले विचार असणारे ईश्वरावर श्रध्दा, भक्ती असणारा समाज निर्माण होऊन त्यांच्या हातून सत्कार्य घडो, असे त्यांना नेहमी वाटे. ज्ञानेश्वर महाराजांच्या इच्छेनुसार आपले बाळ देखील ईश्वरावर निष्ठा असलेले, चांगल्या विचारांचे, संस्कारांचे आणि जीवनात कधीही चुकून अपयश आले, तर खचून न जाता त्यावर मार्ग शोधणारे व्हावे असे वाटत असेल, तर गर्भावस्थेमध्ये पसायदान रोज म्हणायला हवे.

**३) स्वामी विवेकानंदाचे चरित्र :**

स्वामी विवेकानंदाचे चरित्र वाचल्याने बाळाचे विचार उच्च, श्रेष्ठ, विवेकानंदासारखे महान होतात.

**४) गणपतीचे स्तोत्र :**

अथर्वशीर्ष, मनाचे श्लोक देखील वाचावे व मनन करावे. गर्भवतीने स्वच्छ, हलके, सैल असे सुती कपडे वापरावेत. आवडती कला व छंद जोपासावेत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**  
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर  
अहिल्यानगर  
मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगर शहरात 'बाळासाहेब पवार स्मृती करंडक' जिल्हास्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

## १३ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेत १४, १६ व १९ वर्षांखालील एकूण २८ संघांचा सहभाग

नगर – अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठानच्यावतीने १३ डिसेंबर पासून साईदीप क्रिकेट व डिफेंस मैदानावर बाळासाहेब पवार स्मृती करंडक जिल्हास्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नगरमध्ये याहीवर्षी गुलाबी रंगाच्या चेंडूवर ही स्पर्धा खेळवली जाणार आहे. यंदा १४, १६ व १९ वर्षांखालील संघांची स्वतंत्र स्पर्धा होणार आहे. यात मुलांच्या एकूण २८ संघांचा समावेश असेल. या स्पर्धेतील सर्व सामने प्रत्येकी ४० षटकांचे होतील. ही स्पर्धा नॉक आऊट पद्धतीने खेळवली जाणार आहे. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने सलग आठव्या वर्षी ही स्पर्धा घेण्यात येत आहे. १४ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अरूण जगताप व आंजनेय प्रतिष्ठानचे डॉ.राहुल पवार यांनी दिली.



स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना अरूण नाणेकर व संदीप पवार यांनी सांगितले की, कै.बाळासाहेब पवार हे स्वत: उत्तम गोलंदाज व फलंदाज होते. कूचबिहार, सी.के.नायडू या प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये त्यांनी महाराष्ट्र तसेच पश्चिम विभागीय संघाचे प्रतिनिधीत्व केले होते. अहमदनगर जिल्हा संघाचे कर्णधारपदही त्यांनी भूषविले होते. त्यांनी अ.नगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मॅनेजिंग कमिटी सदस्य म्हणून देखील काम पाहिले. क्रॉम्प्टन कंपनीत इंजिनीयर म्हणून काम करतानाच त्यांनी क्रिकेटची आवडही जोपासली होती. नगरमधील मानांकित क्रॉम्प्टन करंडक क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनातही सलग २३ वर्षे त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. क्रिकेटप्रती प्रचंड प्रेम असल्याने नवोदित खेळाडूंसाठी ते हक्काचे मार्गदर्शक होते. नगरमध्ये खेळाडू, पंच यांच्यासह स्कोअररसाठीही त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन शिबिरे घेतली. नगर जिल्ह्यातून दर्जेदार खेळाडू तयार व्हावेत, त्यांना विविध स्पर्धांतून आपले कौशल्य सादर करता यावे यासाठी त्यांनी सातत्याने काम केले.

या स्पर्धेत दररोज एक सामना खेळवला जाणार असून यात शाळा, महाविद्यालय, तालुका, क्लबच्या संघांना प्रवेश देण्यात आला असून स्पर्धेतील १४, १६ व १९ वर्षाखालील गटात विजेत्या व उपविजेत्या संघास रोख पारितोषिक व चषक देवून गौरविण्यात येईल. याशिवाय प्रत्येक सामन्यात मॅन ऑफ दि मॅचचे पारितोषिक देण्यात येणार आहे. या शिवाय मॅन ऑफ दि सिरीज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज अशी पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. या सपर्धेत खेळलेली किरण चोरमले व अनुराग कवडे हे खेळाडू १९ वर्षाखालील भारतीय संघात खेळत असून अनेक इतर खेळाडू महाराष्ट्रा च्या संघात खेळत आहेत. या स्पर्धेचा नगरकर क्रिकेटप्रेमींनी लाभ घेण्याचे आवाहन कपिल पवार, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे प्रा.माणिक विधाते व गणेश गोंडाळ यांनी केले आहे. या स्पर्धे च्या यशस्वीतेसाठी सुनील देवकर, अजय कविटकर, प्रशांत अन्तेपेल्लू, गौतम शिंगी, सोमनाथ नजान, प्रेम कांबळे, ज्ञानेश चव्हाण, विवेक लोखंडे, सागर बनसोडे, उमेश ठाणगे, हेमंतराव मुळे, नंदेश शिंदे, सुभाष येवले आदी परिश्रम घेत आहेत.

# स्वामी समर्थ मंदिरात जन्मोत्सवानिमित्त 'सामुदायिक गुरुचरित्र पारायणा'स प्रारंभ

नगर – अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती जन्मोत्सवानिमित्त श्री गुरुचरित्र पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला आहे. या सामुदायिक पारायण सोहळ्यास भाविकांसह महिला उपस्थित होत्या.

श्री गुरुचरित्र पारायणाचे ५३ अध्याय असून दररोज दुपारी साडेबारा ते तीन वाजेपर्यंत वाचन होते. या सोहळ्याचे व्यासपीठ चालक निखिल देवरे गुरुजी असून भाविकांना आपल्या रसाळ अमृतवाणीतून ते पारायण सांगत आहेत.




गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्त जन्मोत्सवास सामुदायिक श्री गुरुचरित्र पारायण सोहळ्याने प्रारंभ झाला. व्यासपीठावर निखिल देवरे गुरुजी, महिला भाविक आदी (छाया – विजय मते)

१४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता दत्त जन्मोत्सव साजरा होणार असून ७ वा. भक्ती गीतांचा कार्यक्रम होऊन रात्री साडेनऊ वाजता शेजारती होईल. या उत्सवाची सांगता १५ डिसेंबर रोजी होणार असून या दिवशी पहाटे ५ वा. रुद्राभिषेक, सकाळी ९वा. श्री दत्त याग, दुपारी साडेबारा वाजता नैवेद्य आरती, दुपारी १ ते ३ महाप्रसाद असे कार्यक्रम होऊन उत्सवाची सांगता होईल. तरी भाविकांनी या सप्ताहात उपस्थित राहून पारायण सोहळा, दत्तजन्मोत्सव, महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.

# रामकृष्ण शाळेत १० डिसेंबरला 'वार्षिक प्रदर्शना'चे आयोजन

नगर – विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी सालाबदप्रमाणे याही वर्षी श्री राम कृष्ण एज्युकेशन फाऊंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना जूनियर कॉलेज भवानीनगर आय टी आय कॉलेज जवळ अहिल्यानगर येथे १० डिसेंबर रोजी वार्षिक गणित–विज्ञान, चित्रकला, हस्तकला, पाककला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाबरोबरच काळाची गरज ओळखून यावर्षी पुस्तक प्रदर्शनाचा व विक्रीचा नवीन उपक्रम राबवण्यात येणार आहे.



यात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले गणित–विज्ञानाची प्रात्यक्षिके, चित्रकला, हस्तकला व विविध प्रकारचे खाद्यपदार्थ ठेवण्यात येणार आहेत. याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी या हेतूने त्यांना आवडतील अश्या आणि प्रत्येक वयोगटासाठी वेगवेगळ्या अश्या पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन ही करण्यातआले आहे. यामध्ये पन्नास पासून तीनशे रुपयांपर्यंतची पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत. प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्याला आवडत्या वस्तू, खाऊ या बरोबरच पुस्तकांचा खाऊ देखील घेऊन देणे पाल्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरणार आहे. हे लक्षात घेऊन सदर प्रदर्शन सर्वांसाठी खुले ठेवले आहे. शहरातील सर्व नागरिकांनी दुपारी १२ ते २ च्या दरम्यान येऊन याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या मॅनेजमेंट कमिटीने केले आहे.

# समाजाला जोडणारे उपक्रम कौतुकास्पद : ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर

## तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संत जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

नगर – तिळवण तेली ट्रस्टच्या माध्यमातून गेल्या वर्षापासून विविध उपक्रमातून समाजोन्नत्तीचे चांगले काम सुरु आहे. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रमातून समाजाला एकत्रित करुन त्यांच्या उन्नत्तीसाठी जे उमक्रम राबविले जात असल्याने त्यातून त्यांची प्रगती साधली जात आहे. त्याचबरोबर आज श्री संत जगनाडे महाराज यांची जयंतीनिमित्त संत जगनाडे महाराजांचे विचार कृतीतून अंमलात आणीत आहेत. आपल्या संतांनी जी शिकवण दिली, त्याचे अनुकरण करुन आपण आपले जीवन समृद्ध केले पाहिजे. समाजाला जोडणाऱ्या असे उपक्रम कौतुकास्पद असेच आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर यांनी केले.



संताजी भवन श्री विठ्ठल–रुख्मिणी मंदिर, दाळमंडई येथे तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

संताजी भवन श्री विठ्ठल–रुख्मिणी मंदिर, दाळमंडई येथे तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, ट्रस्टचे अध्यक्षा सौ. निता लोखंडे, उपाध्यक्षा सौ. शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, विश्वस्त प्रकाश सैंदर, प्रसाद शिंदे, मनोज क्षीरसागर, सागर काळे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे आदी उपस्थित होत्या.

याप्रसंगी अध्यक्षा सौ. निता लोखंडे म्हणाल्या कि संतांचे विचार हे चिरकाल मनुष्याला मार्गदर्शक आहेत. त्यामुळे या विचारांचा स्विकार करुन जीवनात त्याचा अंगिकार केला पाहिजे. संत जगनाडे महाराजांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गाथांचे पुर्नजिवित करुन लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले. तोच वारसा आपणही पुढे चालविला पाहिजे, असे सांगितले.

यावेळी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती तसेच सर्व समाज बांधवांच्या हस्ते आरती करण्यात आली, पुष्पवृष्टी करून पेढे वाटण्यात आले. सूत्रसंचालन प्रसाद शिंदे यांनी केले तर आभार मनोज क्षीरसागर मानले. यावेळी कार्यक्रमास गोकुळ काळे, अशोक डोळसे, बाळासाहेब धारक, अमोल शिंदे, गणेश धारक, वैभव शिंदे, गणेश देतुले, अंबिका भिसे, सुरेखा लोमटे, लक्ष्मण कर्डीले, राजेंद्र डोळसे, सोनल सैंदर, नागेश भागवत, योगेश भागवत, सचिन शेंदूरकर, श्रीकांत भागवत, निशिकांत शिंदे, चेतन्य देवराव आदी उपस्थित होते

# श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या १०८ युवकांचे रक्तदान

नगर – सालाबादप्रमाणे यावर्षीही दातरंगे मळा येथील दत्त कॉलनीत श्री दत्त जयंती निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यंदा रक्तदान शिबीरात श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या १०८ युवकांनी रक्तदान केले. या शिबीरात दातरंगे मळा परिसरातील नागरीकांसह नगर शहर परिसरातील युवकांनी सहभाग घेतला.

यावेळी आनंदऋषीजी रक्त पेढीचे सुनील महानुर म्हणाले कि, रक्तदान केल्याने आपण कोणाला तरी जीवनदान देतो, याचा आनंद मोठा आहे. रक्तदान प्रत्येकांने वर्षातुन किमान एकदा तरी करावे. रक्त हे कोणत्या फॅक्ट्रीत तयार होत नाही. गरज भासल्यास कोणी तरी रक्तदान करावेच लागते, या उद्देशानेच प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या २२ वर्षापासून रक्तदान शिबीर भरविण्यात येत आहे. रक्तदान करून आपण राष्ट्र सेवा करत आहात अशीच जनसेवा आपणाकडून नेहमी होत राहो तसेच दत्त जयंती उत्सव वर्ष २२ साठी शुभेच्छा दिल्या.



श्री दत्तजयंतीनिमित्त श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या १०८ युवकांचे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

धार्मिक कार्यक्रमाबरोबरच प्रतिष्ठान सामाजिक कार्यक्रमही घेतले आहेत. यंदा रक्तदान शिबीरात श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या १०८ युवकांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबीरात दातरंगे मळा परिसरातील नागरीकांसह नगर शहर परिसरातील युवकांनी सहभाग घेतला. यावेळी १६५ महिलांची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. या शिबीराला आनंदऋषीजी ब्लड बँकेचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या प्रास्तविकात दिपक गुंडू व श्रीनिवास इप्पलपल्ली म्हणाले कि, दत्त जयंतीनिमित्ताने प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी रक्तदान शिबीर भविण्यात येतो आणि या शिबीरात युवक व महिला मोठ्या संख्येने रक्तदान करतात. रक्ताचा तुटवडा असल्यामुळे दरवर्षी प्रतिष्ठानच्यावतीने या शिबीराचे आयोजन केले जाते. तसेच प्रतिष्ठानच्यावतीने वर्षभरात विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दत्त जयंती निमित्त यावर्षी विविध सामाजिक, सांस्कृतिक, तसेच मनोरंजन कार्यक्रम कार्यक्रम घेण्यात येत आहे. रक्तदान शिबीरात १०८ युवकांनी रक्तदान करुन सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. दत्त जयंतीच्या औचित्याने सामाजिक कार्यात मदतीचा हात मिळावा, या उद्देशानेच विविध शिबीरे घेण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

१४ डिसेंबर रोजी दत्त जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम तसेच भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे, त्याच दिवशी सामुदायिक विवाह होणार आहे. दत्त भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत सब्बन यांनी केली आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी व निलाबंरी महिला मंडळाने परिश्रम घेतले.

मास्टर हबीब कव्वाल यांच्या पुण्यतिथीनिमित्त

# नगरमध्ये ९ डिसेंबरला रात्री महफिले मुशायराचे आयोजन

नगर – मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने अहमदनगर येथील मास्टर हबीब निजामी कव्वाल यांच्या पुण्यतिथीनिमित्त ९ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता कॅफे फरहत सीएसआरडी समोर स्टेशन रोड अहमदनगर येथे महफिले मुशायराचे आयोजन करण्यात आले असल्याचे मखदूम सोसायटीच्या सचिव डॉ. कमर सरुर यांनी सांगितले.



यामध्ये अहमदनगर येथील गोरखचंद वर्मा (गोरखपुरी) बिलाल अहमदनगरी, सय्यद खलील, डॉ. कमर सुरुर, आसिफ सर, सुलेमान अहमदनगरी, अर्क अहमदनगरी, मुश्ताक सर, शाकीर सर, शरीफ खान, मुन्नवर हुसेन हे आपली शायरी सादर करणार असल्याचे सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी सांगितले. या साहित्यिक मुशायऱ्याच्या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित रहावे प्रवेश विनामूल्य आहे, असे आवाहन आसिफ सर यांनी केले आहे.



डाळमंडई येथील तेली पंचाचा वाडा येथे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्था व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरती करण्यात आली.

# राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांनी तुकाराम गाथेचा अनमोल ठेवा जतन केला

**हरिभाऊ डोळसे यांचे प्रतिपादन; संताजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी**

नगर – राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांच्या आदर्श विचारांची शिकवण घेऊन तेली समाजाची वाटचाल सुरू आहे. राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराज यांनी तुकाराम गाथेचे तंतोतंत लेखन करून समाजापुढे आणली. तुकाराम गाथेमुळे अनेकांचे जीवन कल्याणकारी झाले आहे. तुकाराम गाथेचा अनमोल ठेवा जतन करण्याचे महान कार्य राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांनी केले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे नाशिक विभागीय कार्याध्यक्ष हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे.

डाळमंडई येथील तेली पंचाचा वाडा येथे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्था व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन श्री विशाल गणेश देवस्थानचे महंत संगमनाथजी महाराज यांचे शिष्य योगी आदित्यनाथ महाराज यांच्या हस्ते पूजन करून करण्यात आले. भाविकांना पेढ्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संताजी नागरी पतसंस्थेचे मानद सचिव हरिभाऊ डोळसे, चेअरमन मीराताई डोळसे, व्हा.चेअरमन श्रीमती सिंधुबाई शिदे, संचालिका श्रीमती शिला देवकर, सौ. जयश्री धारक, सौ.सरला गोकुळ शिदे, संचालक श्रीराम हजारे, पोपटराव शेजवळ, गणेश धारक, विजय हजारे, राऊत सदाशिव, बाळासाहेब धारक, मोहन कोटकर, देविदास ढवळे, उमाकांत डोळसे, ऑडिटर प्रमोद वाळके, व्यवस्थापक जब्बार शेख आदी उपस्थित होते.

# सर्व रोगनिदान शिबिरे ही काळाची गरज : शितल जगताप

नगर – धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्य आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असून आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे देखील आजारपण आपल्या अंगावर काढले जाते. सागर बोरुडे हे स्वतः डॉक्टर असून त्याचा उपयोग समाजाला व्हावा यासाठी शेवटच्या घटकापर्यंत आरोग्याच्या सुविधा घेऊन जाण्याचे काम ते करत आहे. यावेळी नागरिकांना आरोग्य कार्डचे वाटप करीत सवलतीच्या दरामध्ये आरोग्याचे उपचार घेता येईल, सर्व रोग निदान शिबिर ही काळाची गरज बनली असून आजारपणाचे निदान होऊन योग्य वेळी योग्य उपचार मिळतील व नागरिकांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होईल असे प्रतिपादन माजी नगरसेविका शितल जगताप यांनी केले.



मानवता सेवा संस्थेच्यावतीने पंचवटीनगर, पाईपलाईन रोड येथे सर्व रोग निदान शिबिराचे उद्घाटन शितल जगताप यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

मानवता सेवा संस्थेच्यावतीने पंचवटीनगर, पाईपलाईन रोड येथे सर्व रोग निदान शिबिराचे उद्घाटन शितल जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, मीना चव्हाण, योगेश ठुबे, डॉ. सुनील पवार, किसन कसबे, राजू ढवण, रंजना उकिरडे, आदित्य काकडे, धीरज लोणारे, सुरज पाचारणे, विनोद जोंधळे, सुरज शिंदे, अक्षय वाणी, अमोल गव्हाणे, हेमलता कांबळे, रोहिणी अंकुश, श्रुतिका दरेकर, अनिता देशमुख, सुरेखा फुलपगार, कांचन इंगोले आदी उपस्थित होते.

संपत बारस्कर म्हणाले की, सण, उत्सव, वाढदिवस साजरे करीत असताना प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जोपासत आपले कर्तव्य पार पाडावे. डॉ. सागर बोरुडे यांचे सामाजिक उपक्रम नेहमीच कौतुकास्पद असतात गेल्या ८ वर्षापासून सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करून नागरिकांना मोफत आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहे. याचबरोबर प्रभागातील विकासाचे काम देखील ते मार्गी लावत लाईट, पाणी, कचरा गाडी यासारख्या प्रश्नाकडे जातीने लक्ष देत प्रश्न मार्गी लावतात. सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आरोग्य सुविधा महागडी सेवा होत चालली असून, त्यामुळे गरजूवंत रुग्ण आपल्या आजारपणाकडे दुर्लक्ष करत असतात, त्यामुळे डॉ. सागर बोरुडे यांनी प्रभागातील नागरिकांना आरोग्य शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी करून घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे, त्यामुळे नागरिकांना आजारपणाचे निदान करून उपचार करून घेता येईल असे ते म्हणाले.

डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, मानवता सेवा संस्थेच्या वतीने सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करून हृदयरोग, मेंदू मणके, अस्थिरोग, हाडाचे विकार, मुळव्याध, स्त्रीरोग, रक्त लघवी व आयुर्वेदिक तपासणी करण्यात आली, वर्षभर सकारात्मक दृष्टिकोन ठेवत विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहे, समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून आपले कर्तव्य पार पाडले जाते.

आमदार संग्राम जगताप व संपत बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाच्या कामाबरोबर सामाजिक बांधिलकी देखील जोपासली जाते. याच दिनदर्शिकेचे वितरण करीत आपण केलेल्या कामाचा लेखाजोखा प्रभागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाते असे ते म्हणाले.

# निवडणुकीचा जय पराजय मी मानत नाही; माझा विजय मी लोकांच्या डोळ्यात पहिलाय

### अभिषेक कळमकर यांचे प्रतिपादन



महाविकास आघाडीच्या स्नेहसंवाद मेळाव्यात मनोगत व्यक्त करताना अभिषेक कळमकर.

## महाविकास आघाडींचा स्नेहसंवाद मेळावा

नगर – लोकशाहीतील जय पराजयाला मी घाबरत नाही. एका निवडणुकीत जरी आपला पराभव झाला असला तरी शहरातील जनतेने ८०००० चे मोठे मताधिक्य देऊन आपल्यावर विश्वास दाखवला त्याबद्दल मी नगरकरांचे आभार मानतो. विधानसभेची निवडणूक मी जीव पणाला लावून लढलो हे मला नगरच्या जनतेला सांगायचे आहे. मी व माझ्या सहकाऱ्यांनी शहरातील अवैद्य धंद्यांच्या विरुद्ध आवाज उठवला. माझ्या एक पण सहकाराचे अवैध धंदे नाही हे मी ताठ मानेने सांगू शकतो. ही निवडणूक सोपी नव्हती अभिषेक पण यांना सोपा नव्हता, मी यांना निवडणुकीपूर्वी पण घाम फोडला, निवडणुकीत सुद्धा आणि भविष्यातही पण घाम फोडणार आहे. हा विजय धनशक्तीचा व ईव्हीएम मशिनीतून झालेल्या छेडछाडीचा विजय आहे. लोकशाही पद्धतीने निवडणूक होणे गरजेचे होते सर्व यंत्रणा, मीडिया त्यांचेकडे होती. माझ्याकडे शहर विकासाचे व्हिजन आहे. काहीही झाले तरी जनता आपल्याच सोबत आहे याची खात्री मला या निवडणुकीतून आली आहे. महापौर पदाच्या काळात केलेल्या विकास कामांमुळे लोकांना नगर शहराचा विकास कोण करू शकतो हे नगरकरांना माहीत आहे त्यामुळे पुन्हा नगरकरांमध्ये जाऊन त्यांच्या समस्या आपल्या समजून त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न येत्या काळात करणार आहे. सर्व समाजात शांतता बंधुभाव निर्माण करून लोकाभिमुख विकास कामे येत्या काळात शहरात करण्यात येतील. यात कधीही आपला आणि विरोधक असा भेदभाव करण्यात येणार नाही. मात्र या निवडणुकीत काही मंडळींनी धर्म, जाती, भेद निर्माण करत जनतेच्या मनात विष पेरले. आता मात्र आपल्याला याची दुरुस्ती करायची आहे. आपणही दादाभाऊ कळमकर यांचे वारसदार असून संघर्ष करून लढणे आपल्या रक्तात आहे. त्यामुळे आता पुन्हा नव्या उभारीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसमवेत पुन्हा जनतेत जाणार आहे. जनतेवर कार्यकर्त्यांवर व सर्वसामान्य नागरिकांवर झालेला अन्याय आपण कधीही सहन करणार नाही. यासाठी लढा द्यावा लागला तरी चालेल आपण मागे हटणार नाही, असे आश्वासन यावेळी अभिषेक कळमकर यांनी उपस्थितांसमोर नगरकरांना दिले.

अहिल्यानगर विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर मित्र मंडळांनी आयोजित केलेल्या स्नेह संवाद मेळाव्यात अभिषेक कळमकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार दादाभाऊ कळमकर, माजी नगरसेवक संजय झिंजे, अशोक बाबर, अंबादास गारुडकर, सुनील त्रिपाठी, नलिनी गायकवाड उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे कार्यकर्ते आणि नगरकरांच्या मनात एक हळहळ होती.ती स्नेहसंवाद मेळाव्याच्या माध्यमातून दूर झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत यावेळी व्यक्त केले.

यावेळी शिवसेनेचे ओमकार सातपुते, दिलदारसिंग बिर, मृणाल भिंगारदिवे, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष अंबादास शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नीताताई बर्वे, खुशी जाधव, हेलनताई पाटोळे, किरण सपकाळ, भीमराज कराळे, अनिकेत कराळे, उज्वला कळमकर, नितीन खंडागळे, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, अत्तर शेख, सागर चाबुकस्वार, आम आदमी पार्टीच्या विद्याताई शिंदे, दत्ता घुले, प्रा.अमोल खाडे, हेमंत तडके आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवीन पेन्शनबाबत द्यावयाचा विकल्प कोणाही कर्मचाऱ्यांनी तूर्तास देऊ नये

### राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव

नगर – राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा ७ डिसेंबर रोजी संस्थेच्या कार्यालयात पार पडली. यामध्ये सुधारित राष्ट्रीय निवृती वेतन योजनेच्या यशस्वीतेबाबत व शासनाकडून संघटनेस मिळालेल्या मान्यतेबाबत संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे यांनी मार्गदर्शन केले.

या विषयाबाबत कर्मचारी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. नवीन पेन्शनबाबत कर्मचाऱ्यांनी द्यावयाचा विकल्प, तूर्तास २० मार्च २०२५ पर्यंत कोणीही देऊ नये, असा ठराव बैठकीत घेण्यात आला. याबाबत राज्य संघटनेशी चर्चा करून पुढील निर्णय कळविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

सभेमध्ये संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या रिक्त झालेल्या पदावर नवीन पदाधिकाऱ्यांची नेमणूक करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या सभेत संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी कर्मचाऱ्यांची जी १० टक्के रक्कम कपात केली जाते, ती परत मिळण्याकरिता येथून पुढे आंदोलन करून सदरची मागणी पदरात पाडून घेतली जाणार असल्याचे सभासदांना आश्वासित केले. त्यानंतर इतर विषयावर साधकबाधक चर्चा करण्यात करुन सभा शांततेत पार पडली.

# आर्यन आणि कार्तिकची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड





नगर – पुणे येथील रावेत या ठिकाणी झालेल्या शालेय राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज अहमदनगर मधिल खेळाडू आर्यन आगरकर याने सुवर्णपदक मिळविले त्याची चंदिगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुराश स्पर्धे साठी निवड झाली.

इंदापूर येथे झालेल्या शालेय विभागीय स्पर्धेत न्यू आर्ट्स कॉलेज मधील आर्यन आगरकर आणि सुरज धनगर यांनी सुवर्णपदक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. तसेच संभाजीनगर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत कार्तिक ज्ञानदेव कोल्हे याने रौप्यपदक पटकावले व त्याची भोपाळ येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहील्यानगर येथे झालेल्या विभागीय स्पर्धेतही कार्तिक ने सुवर्ण पदक मिळविले होते.

यशस्वी खेळाडूंचे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अँड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयवंत वाघ, खजिनदार अँड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य प्रा. कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षण प्रा. सुभाष गोरे यांनी त्यांचे कौतुक केले. तिला क्रीडा शिक्षक प्रा. सुधाकर सुंबे, प्रा. आकाश नढे यांचे मार्गदर्शन मिळाले.

# सोशल मिडियावर विनोदाऐवजी सामाजिक विषयावर रिल्स बनवा



श्रीनिवास बोज्ञा

नगर – सध्या सोशल मीडिया वर मोठया प्रमाणात रिल्स चे बनवितात परंतु हे रिल्स विनोदावर अवलंबून असतात. या ऐवजी सामाजिक विषयावर रिल्स बनवावे असे आवाहन श्रीनिवास बोज्ञा यांनी केली आहे.

रिल्स बनविण्याचे फैड मोठया प्रमाणात झाले असून गल्ली बोळामध्ये लहान मुला पासून तर मोठया पर्यंत रिल्स बनवून सोशल मीडियावर टाकत आहे. या रिल्सचे सर्व विषय हे विनोदी असतात व रिल्स पाहणारे ही अत्यंत आतुरतेने हे रिल्स पाहून पण आनंद घेतात. परंतु जर हे रिल्स सामाजिक विषयावर काढण्यात आली तर नक्कीच एक समाज प्रबोधनाचा कार्य यांच्या कडून होईल.

नुकतेच एका रिल्स मध्ये आई वडील मोबाईल घेऊन बसतात म्हणून मुलगा ही मोबाईल घेऊन बसतो नंतर वडील मोबाईल सोडून पुस्तक हातात घेतात, पत्नी च्या हातात पुस्तक देतात हे पाहून मुलगा ही पुस्तक हातात घेतो. अश्या प्रकारे समाजात बदल घडवून आणवयाचे असेल तर अनेक सामाजिक विषयावर रिल्स बनवून प्रबोधन करता येईल. सध्या सोशल मीडियावर रिल्स पाहणाऱ्यांचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढले असल्याने याचा उपयोग समाज परिवर्तन होण्यासाठी समाजात चांगले गुण प्रस्थापित होण्यासाठी चांगले रिल्स कसे करता येईल हे पाहणे गरजेचे आहे. अश्या पद्धतीने समाजा मध्ये चांगल्या सवयी लावण्यासाठी समाज प्रबोधन रिल्स बनवावे असे आवाहन श्रीनिवास बोज्ञा यांनी केले आहे.

# शहर वकील संघाच्या निवडणुकीसाठी २० डिसेंबरला मतदान

### खजिनदारपदी अनुराधा येवले, सहसचिवपदी मनिष केळगंद्रे, महिला सहसचिवपदी जया पाटोळे यांची बिनविरोध निवड

नगर – जिल्हा न्यायालयातील अहमदनगर बार असोसिएशनच्या सन २०२५ च्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल झाले असून अर्जांची छाननी, माघार आदी प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. या निवडणुकीतील सहसचिव, महिला सह सचिव, खजिनदार, महिला व पुरुष कार्यकारीणी सदस्य आदी पदांवर प्रत्येकी एकच अर्ज शिल्लक राहिल्याने या पदांची निवडणूक बिनविरोध झाली आहे. उर्वरित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या पदांच्या निवडणुकीसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी अ‍ॅड.अरुण भालसिंग यांनी दिली.

असोसिएशनच्या अध्यक्षपदा करीता होणाऱ्या निवडणुकीत अ‍ॅड. राजु कातोरे व अ‍ॅड.संदिप काळे यांच्यात सरळ लढत होणार असून, उपाध्यक्षपदाकरीता अ‍ॅड.संदीपकुमार पाखरे व अ‍ॅड.वैभव आघाव यांच्यात तर सचिव पदासाठी अ‍ॅड.संदिप बुरके व अ‍ॅड.विनोद शेटे यांच्यात सरळ लढत होणार आहे.

अर्ज माघारी नंतर असोसिएशनच्या खजिनदारपदी अ‍ॅड.अनुराधा येवले, सहसचिवपदी अ‍ॅड.मनिष केळगंद्रे, महिला सह सचिवपदी अ‍ॅड. जया पाटोळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याचप्रमाणे महिला कार्यकारीणीपदी अ‍ॅड.ज्योती हिमणे तसेच पुरुष कार्यकारिणी पदांवर अ‍ॅड.अभिजीत देशमुख, अ‍ॅड.निखील ढोले, अ‍ॅड.दिपक आडोळे, अ‍ॅड.विजय केदार, अ‍ॅड.रामेश्वर कराळे व अ‍ॅड.शिवाजी शिंदे आदींचीही बिनविरोध निवड झालेली आहे.

उर्वरित पदांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार असून त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी होऊन निवडणुकीचा अंतिम निकाल जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणुक निर्णय अधिकारी अ‍ॅड. अरुण भालसिंग व अ‍ॅड. भाऊसाहेब घुले यांनी दिली.







'महा सिक्युरटेक एक्सपो' चे उद्घाटन करण्यात आल्याचे पहिल्या छायाचित्रात तर प्रदर्शनाला खा. निलेश लंके व माजी खासदार सुजय विखे पा. यांनी भेट दिली.

# नगरची हायटेक व डिजीटलकडे वाटचाल : सुजय विखे पाटील

### अहिल्यानगर मधील 'महा सिक्युरटेक एक्सपो 'ला प्रतिसाद

नगर – नगर जिल्ह्यात विविध ठिकाणी सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा प्रशासनाच्या मार्फत बसवण्यात आली असून यामुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागत आहेत तथा ज़िल्हा परिषद मार्फत जिल्ह्यातील जि.प. शाळांना डिजिटल स्मार्ट बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले असून मुलांना डिजिटल शिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे याच मुळे नगर जिल्ह्याची हायटेक व डिजिटल होण्यासाठी वाटचाल चालू आहे असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रदर्शनास भेट दिली असता सांगितले.

अहिल्यानगरमध्ये नुकतेच जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणांच्या वापरा बाबत 'महा सिक्युरटेक एक्सपो ' चे नाथकृपा सांस्कृतिक भवन येथे आयोजन करण्यात आले होते. यात अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा सीसीटीव्ही ए.आय. आणि संगणक आधारित नवीन सुरक्षा उपकरणे व ड्रोन कॅमेरा टेक्नोलॉजी देणाऱ्या देश विदेशातील ३० पेक्षा जास्त प्रख्यात कंपन्या यात सहभागी झाल्या होत्या. व्यवसायिकांना – ग्राहकांना ही अत्याधुनिक उपकरणांचे प्रात्यक्षिक पहायला मिळाले. अशा स्वरूपाचे आगळे वेगळे अभूतपूर्व प्रदर्शन नगर मध्ये प्रथमच आयोजन करण्यात आले होते.

उद्घाटन समारंभला अहिल्यानगर कॉम्प्युटर असोसिएशन व सीसीटीव्ही असोसिएशन तसेच टाईटल स्पॉन्सर – हिकव्हिजन, आर पी टेक, प्रामा व मीडिया पार्टनर – ए.टी.एस सिस्टिम प्रा.ली., इनफिल्ड सर्व्हिसेस, फायर अँड सेफ्टी, इंस्पायर कॉम्प्युटर्स, सेक्युरअशिया चे प्रतिनिधी उपस्थित होते. अहिल्यानगर, नाशिक, संभाजीनगर, बीड, बारामती, दिल्ली, गुजरात, सिल्वासा आदी शहरांमधून व्यावसायिक, अहिल्यानगर मोबाईल अससोसिएशनचे व संभाजीनगर कॉम्प्युटर अससोसिएशनचे प्रतिनिधी तसेच या क्षेत्रातील प्रमुख व्यवसायकांची देखील उपस्थित होते.

आर – ईशा सिक्युरटेक प्रा.ली. या कंपनीचे एमडी, सी ई ओ, राहुल मुथा व त्यांचे सर्व प्रतिनिधींनी या प्रदर्शनाचे आयोजन केले होते या एक्सपोला डॉ. सुजय विखे पाटील, खासदार निलेश लंके, नागेबाबा पतसंस्थेचे चेअरमन कडूभाऊ काळे, सोहम ग्रुपचे एम. डी. अमित बुरा तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी भेट देत प्रदर्शनाचे कौतुक केले. असे इंटरनॅशनल लेव्हल एक्सपो दरवर्षी किमान दोन–तीन दिवस भरवावे अशी अशी अपेक्षा व्यक्त केली.

एका छताखाली देश–विदेशातील विविध कंपन्यांची आधुनिक सुरक्षा यंत्रणा आणि असंख्य प्रकारचे सीसीटीव्ही, कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, फायर अलार्म सिस्टीम, डिस्प्ले, सॉफ्टवेअर, ड्रोन, डिजिटल बोर्ड, बायोमेट्रिक सिस्टीम, इलेक्ट्रिकल ॲक्सेसरीज, केबल, पावर–सप्लाय, हाउसिंग अशा इलेक्ट्रॉनिक सेक्युरिटी सिस्टिम असे बरेच उपकरणाचे आलेल्या नवीन टेक्नॉलॉजीचा एआय तंत्रज्ञान यांचे काम कसे चालते याचे प्रात्यक्षिक व्यवसायिकांना – ग्राहकांना देण्यात आले. मेड इन इंडिया असणाऱ्या प्रॉडक्ट ला जास्तीत जास्त मागणी होती.

# नगरमध्ये ११ डिसेंबर रोजी मुख्याध्यापक संघाचे जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन


नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे संयुक्त जिल्हास्तरीय एक दिवसीय चर्चासत्राचे ११ डिसेंबर रोजी नगर मधील टिळक रोड वरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात करण्यात आले आहे. याचे उद्घाटन राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर व संपत सूर्यवंशी यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी जिल्ह्याचे शिक्षण अधिकारी अशोकराव कडूस, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बी. जे. पाटील, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, वेतन पथक विभागाचे अधीक्षक रामदास मस्के आदींसह शिक्षण विभागाचे सर्व उपशिक्षणाधिकारी व अधिकारी यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती नगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित यांनी दिली.

या चर्चासत्रामध्ये माजी शिक्षणाधिकारी के.एन. चौधरी हे सेवा पुस्तक व सेवा जेष्ठता यादी या विषयावर तर माजी शिक्षणाधिकारी अरुण धामणे हे मुख्याध्यापकांची जबाबदारी व ऑनलाईन कामकाज या विषयावर महत्वपूर्ण व्याख्यान देणार आहेत. तसेच या चर्चासत्रामध्ये सर्व विषयाच्या संदर्भातील प्रश्नांचे शंका समाधान व शिक्षण क्षेत्रातील विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

चर्चासत्रास जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे, सरचिटणीस मिथुन डोंगरे, उपाध्यक्ष राजेंद्र वाघ, बाळासाहेब वाघ, आबासाहेब गडदे, बाळासाहेब जंगले, प्रकाश देशमुख, बालाजी गायकवाड, संजय लहारे, मंगेश जाधव, मच्छिंद्र राऊत, ज्ञानदेव बेरड, कैलास साठे, भाऊसाहेब रोहकले, दशरथ कोपनर, शितल बांगर, संगीता हासे, संगीता मस्के व ज्योत्स्ना शिंदे आदींनी केले आहे.

# नगर शहरात १५ डिसेंबरला जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

### राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडला जाणार जिल्ह्याचा संघ



नगर – अहमदनगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्यावतीने १५ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा वाडिया पार्क जिल्हा क्रीडा संकुल येथे रंगणार आहे. यामध्ये नगर जिल्ह्याचा संघ निवडला जाणार असून, हा संघ राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेत २० ते १६ वर्ष वयोगटातील पुरुष व महिला खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे रंगनाथ डागवाले, सुनील जाधव व दिनेश भालेराव यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष व महिला १० कि.मी., २० वर्ष वयोगट मुले ८ कि.मी., १८ वर्ष वयोगट मुले ६ कि.मी., १६ वर्ष वयोगट मुले व मुली २ कि.मी., मुलींमध्ये २० वर्ष वयोगट ६ कि.मी., १८ वर्ष वयोगट ४ कि.मी., १६ वर्ष वयोगट २ कि.मी. धावण्याच्या स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र व मेडल देण्यात येणार आहे. १४ वर्षा खालील खेळाडू या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. नाव नोंदणी स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ७.०० वाजता होणार आहे. सर्व खेळाडूंनी आपले एएफआय व युआयडी नंबर काढणे आवश्यक असून, त्याशिवाय राज्य स्पर्धा खेळता येणार नसल्याचे म्हंटले आहे. ही स्पर्धा फक्त जिल्ह्यातील खेळाडूंसाठी आहे. राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धा अमरावती येथे ३० डिसेंबर रोजी होणार आहे.

माहितीसाठी दिनेश भालेराव ९९२३८३७८८८, राहुल काळे ९९७५३२०८३७ व श्रीरामसेतु आवारी ९३२२०१५०४६ यांना संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे

# अनावश्यक खर्च टाळण्यासाठी महानगरपालिकेचे नवीन बोधचिन्ह तयार करण्याचा निर्णय रद्द करा

नगर – महानगरपालिकेचे सध्या अस्तित्वात असलेले बोधचिन्ह बदलण्याची आवश्यकता नाही. कारण राज्य शासनाने केवळ अहमदनगर महानगरपालिकेचे नामांतर अहिल्यानगर महानगरपालिका असे करण्याचे निर्देश दिलेले आहेत. २००३ साली महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर तत्कालीन जेष्ठ पत्रकार व तज्ञांच्या समितीने सध्या अस्तित्वात असलेल्या बोधचिन्हाची निवड केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या सध्या वापरात असलेल्या बोधचिन्हामध्ये फक्त नावाचा बदल करून आहे तेच बोधचिन्ह वापरण्यात यावे.

प्रस्तावित बोधचिन्हपेक्षा सध्या अस्तित्वात असलेले बोधचिन्ह हे अतिशय ठळक व स्पष्ट असून त्यामध्ये फक्त नावाचा बदल करावा. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती पाहता नवीन बोधचिन्ह तयार करण्यासाठीचा अनावश्यक खर्च टाळून नव्याने बोधचिन्ह तयार करण्याचा निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पत्रामध्ये नावात बदल केलेल्या सुधारीत बोधचिन्हाचा समावेश देखील करण्यात आला आहे.

घ.नं. 374/सदर बाजार/2024-25
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक– 02/12/2024

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. संतोष बाबुलाल लालबेगी, वय–55 वर्षे, धंदा–नोकरी, रा. 377 अ, सदर बाजार, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. 377, सदर बाजार, सर्व्हे नं. 213/366, सदर बाजार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) रजिस्टर व्यवस्थापत्र क्र. 2312/1983 दिनांक 28/06/1983 (2) नोटरी प्रतिज्ञापत्र क्र. 181/2024 दिनांक 02/02/2024 व नोटरी प्रतिज्ञापत्र क्र. 2400/2024 दिनांक 31/08/2024 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
घ.नं. 377, सदर बाजार
क्षेत्रफळ 517.00 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## जाहीर प्रगटन

तमाम लोकांस सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, **आमचे अशिल नं. १. संजय मच्छिंद्रनाथ शिदोरे व २. सुलोचना मच्छिंद्रनाथ शिदोरे दोघे रा. बंगला नं. १६, जिल्हा परिषद कॉलनी, आगरकर मळा, जैन स्थानक जवळ, स्टेशन रोड, अहमदनगर** यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन कळविण्यात येते की,

**मिळकत वर्णन :-** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील **मौजे चाहुराणा खुर्द येथील सर्व्हे नं. ३३/१ चे एकुण क्षेत्र १हे. २९ आर + पो.ख. ० हे. ०४ आर असे एकुण क्षेत्र १हे. ३३आर (३ एकर - ७गुंठे + पो.ख. ४गुंठे असे एकुण ३ एकर- ११ गुंठे).** यांसी चतु:सिमा– पुर्वेस – ओढा, दक्षिणेस – सर्व्हे नं. ३२, पश्चिमेस – सर्व्हे नं. ३३ / २ व उत्तरेस – सर्व्हे नं.३४ ही संपुर्ण मिळकत आमचे अशिलाचे वडिल मच्छिंद्रनाथ नाथुजी शिदोरे यांच्या मालकीची होती व त्यांनी सदर मिळकत सन १९७२ साली नोंदणीकृत खरेदीखतान्वये कायमखुष खरेदीने घेतलेली होती व त्यांच्या निधनानंतर सदर मिळकत आमचे अशिल संजय मच्छिंद्रनाथ शिदोरे, सुलोचना मच्छिंद्रनाथ शिदोरे व मंजुषा रविंद्र मोटे यांच्या मालकीची आहे. परंतु सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर मंदाबाई किसन राऊत, मनोज किसन राऊत, माणिक किसन राऊत, उषा नितीन डोके, रमेश निवृत्ती राऊत, बाबासाहेब किशोर राऊत, जिजाबाई किशोर राऊत, दत्तात्रय पंडित खैरे, शरद पंडित खैरे, धिरज पंडित खैरे, सुनिल गुलाब राऊत व संजय गुलाब राऊत यांचे नावे आहे व त्यापैकी दत्तात्रय पंडित खैरे, शरद पंडित खैरे व धिरज पंडित खैरे यांनी अनाधिकृत कुठल्याही कागदपत्रांची शहनिशा न करता ३ आर क्षेत्र मानिव बिगरशेती केलेले आहे. सदर ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या व्यक्तींना सदर मिळकतीचे कुठलेही कायदेशीर मालकीहक्क व अधिकार प्राप्त झालेले नाही, कारण आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर मालक आहे. परंतु सदर उताऱ्यावरील आपल्या नाव असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरील नमुद व्यक्ती सदर मिळकत विक्रीच्या प्रयत्नात आहे असे आमच्या अशिलास खात्री लायक समजले आहे.

**सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर नमुद व्यक्तींना कुठल्याही प्रकारची मिळकतीची कायदेशीर मालकी व टायटल नाही त्यामुळे सदर ७/१२ उताऱ्यावरील वर नमुद नाव असलेल्या** व्यक्तींबरोबर कोणीही कुठल्याही प्रकारचे तोंडी अगर लेखी व्यवहार करु नये व अगर केल्यास सदरचे व्यवहार व करार आमच्या अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. तसेच कोणाचीही आर्थिक फसगत होऊ नये व विनाकारण वाद उपस्थित होऊन नये या प्रामाणिक हेतुने आमचे अशिल प्रस्तुत जाहिर प्रगटनाद्वारे तमाम लोकास कळवितात की व सदर मिळकतीबाबत **मंदाबाई किसन राऊत, मनोज किसन राऊत, माणिक किसन राऊत, उषा नितीन डोके, रमेश निवृत्ती राऊत, बाबसाहेब किशोर राऊत, जिजाबाई किशोर राऊत, दत्तात्रय पंडित खैरे, शरद पंडित खैरे, धिरज पंडित खैरे, सुनिल गुलाब राऊत व संजय गुलाब राऊत** यांचे बरोबर कोणीही सदर वर नमुद मिळकत खरेदी विक्रीचे व्यवहार करु नये अथवा मिळकतीबाबत कुठल्याप्रकारे आर्थिक व्यवहार, करार इत्यादी करु नये अगर केल्यास तो आमचे अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना मिळकतीमध्ये कुठलेही कायदेशीर हक्क व अधिकार मुळीच प्राप्त होणार नाही व अगर केल्यास मिळकत खरेदी घेणार व विक्री करणार यांच्या विरुध्द आमच्या अशिल योग्य ती दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणुक होऊ नये या हेतुने प्रस्तुतचे जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिली असे.

ता. ०९/१२/२०२४.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, साई कॉर्नर बिल्डींग,
चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९


# अर्थजगत

**रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीच्या यंदाच्या बैठकीनंतर, स्मॉल फायनान्स बँका (एसएफबी) पूर्व-मंजूर क्रेडिट लाइन व्यवस्थेअंतर्गत युपीआयद्वारे कर्ज देऊ शकतील,असा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजेच आरबीआयने आता छोट्या वित्त बँकांना युपीआयद्वारे पूर्व-मंजूर कर्ज देण्याची परवानगी दिली आहे. यामुळे युपीआयद्वारे पेमेंट करणारे कोणतेही पेमेंट करण्यापूर्वी क्रेडिट लाइन निवडू शकतात. युपीआय ग्राहकांना लवकरच या नवीन सुविधेचा लाभ घेता येणार आहे. छोटे व्यावसायिक, लघुउद्योजक आणि ग्रामीण आणि निम-शहरी भागातील व्यक्तींसह कर्जापासून वंचित गटांना मदत करण्याच्या उद्देशाने या हालचालीचा उद्देश आहे. यापूर्वी, ही सुविधा एसएफबी, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि पेमेंट बँकांना उपलब्ध नव्हती.**

## पुन्हा नव्या शिखराकडे...?

■ शेअर बाजार

नोव्हेंबर महिन्याची सांगता काहीशा निराशाजनक स्थितीत झाली असली तरी डिसेंबर सिरीजची सुरुवात करताना म्हणजे २९ नोव्हेंबरपासून भारतीय शेअर बाजाराने पुन्हा वरच्या दिशेने झेपावण्याची प्रक्रिया सुरू केली आणि २ ते ६ डिसेंबर या सप्ताहात ती तशीच कायम राहिल्याचे दिसून आले. वास्तविक पाहता, गतसप्ताहात बाजारावर परिणाम करणाऱ्या अनेक घटना-घडामोडी घडूनही त्या सर्वांतील सकारात्मकता स्वीकारत बाजाराने चढती भाजणी कायम ठेवल्याचे दिसले. गेल्या आठवड्यात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १९०६.३३ अंकांनी म्हणजेच जवळपास २.३८ टक्क्यांनी वधारून ८१,७०९.१२ वर बंद झाला; तर निफ्टीमध्ये गतसप्ताहात ५४६.७ अंकांची म्हणजेच



२.२६ टक्क्यांची वाढ झाली आणि हा निर्देशांक २४,६७७.८० अंकांवर बंद झाला. बँकनिफ्टीचा विचार करता ५१,७२९ पर्यंत खाली गेलेला हा निर्देशांक जोरदार उसळी घेत ५३,९३० पर्यंत झेपावून सप्ताहाखेरीस ५३५१२ समीप बंद झाला आहे. गेल्या आठवड्यामध्ये मिडकॅप, स्मॉलकॅपसह बहुतांश क्षेत्रातील समभागांमध्ये दमदार तेजी दिसून आली आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये गेल्या सहा महिन्यातील सर्वात मोठी साप्ताहिक वाढ दिसून आली.

वास्तविक, रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरणामुळे आणि त्याआधी जाहीर झालेल्या जीडीपीमधील घसरणीच्या आकडेवारीमुळे शेअर बाजारात चढउतार दिसून आले. परंतु अंतिमतः बाजाराने वाढीच्या दिशेने कौल दिला. रिलायन्स इंडस्ट्रीज, एचडीएफसी बँक, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टीसीएस, स्टेट बँक ऑफ इंडिया, बजाज ऑटो यांसारख्या बाजारातील दिग्गज खेळाडूंची कामगिरी दमदार राहिल्यामुळे बाजाराला बूस्टर मिळाला.

रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरणामध्ये पतधोरण समितीचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सलग११ व्यांदा रेपोदरामध्ये कोणताही बदल न करण्याचा निर्णय जाहीर केला. वास्तविक, आर्थिक विकास दर दोन वर्षांच्या नीचांकी पातळीवर गेलेला आहे. महागाईमध्य लक्षणीय वाढ झालेली आहे. तसेच रुपयानेही विक्रमी नीचांकी पातळी गाठली आहे. असे असूनही केंद्राकडून आरबीआयने व्याजदरात कपात करावी यासाठी दबाव येत होता. परंतु आरबीआयने त्याची दखल घेतली नाही. पण आरबीआयने अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर पूर्वअंदाजि ;त ७.२ टक्क्यांवरुन कमी करून ६.६ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे बाजारात घसरण येईल अशी अपेक्षा होती. परंतु कॅश रिझर्व्ह रेशो म्हणजेच सीआरआरमध्ये अर्ध्या टक्क्यांची कपात करून तो ४.५ टक्क्यांवरून ४ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे देशातील बँकिंग व्यवस्थेत १.१६ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. मागील काही महिन्यांपासून बँकांना जी भांडवलटंचाई जाणवत होती त्या समस्येवर आरबीआयचा उतारा लाभदायक ठरणार आहे. याची शक्यता गृहित धरुन आरबीआयच्या पतधोरणानंतर बँकिंग समभागांनी जोरदार उसळी घेतली होती.

गतसप्ताहातील तेजीचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून विक्रीचा मारा थांबवून खरेदीच्या दिशेने सुरू केलेला प्रवास. एफआयआयनी २४,४०० कोटींहून अधिक रक्कम ओतल्यामुळे बाजाराचा कल बदलल्याचे दिसून आले.

याखेरीज महाराष्ट्रातील सरकार स्थापनेचा तिढा सुटला आहे. अमेरिकन बाजारात नॅसडॅक निर्देशांकाने सार्वकालिक उच्चांकी पातळी गाठली आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. या सर्वांचे सकारात्मक पडसाद भारतीय शेअर बाजारात दिसून आले.

चालू आठवड्याचा विचार करता टेक्निकल चार्टनुसार निफ्टीसाठी २४,३०० च्या पातळीवर भक्कम आधार आहे, तर २५००० ते २५२०० च्या पातळीवर अडथळा पातळी आहे. शुक्रवारची २४८५५ ची उच्चांकी पातळी तोडून वरच्या पातळीवर बाजार स्थिरावल्यास २५ हजारांपल्याड जाण्याचा मार्ग मोकळा होईल. याउलट २४३०० च्या खाली घसरल्यास २४१३३ च्या पातळीवर भक्कम आधार आहे. त्याखाली गेल्यास २३,९०० पर्यंतची घसरण पहावयास मिळू शकते.

सध्याचा बाजाराचा कल तेजीचा असला आणि बँकिंग क्षेत्र याचे नेतृत्व करताना दिसत असले तरी विकासदरांसंदर्भातील अनुमाने काहीशी चिंताजनक आहेत. त्यामुळे सेल ऑन राईज आणि बाय ऑन डिप्स या दोन्ही रणनीती जोखीम क्षमतेनुसार अवलंबायला हव्यात.

समभागांचा विचार करता टाटा पॉवरची आगामी गुंतवणूक योजना लक्षात घेता हा समभाग ५ ते १० टक्क्यांनी येणाऱ्या काळात वधारू शकतो. एसबीआय आणि एचडीएफसी बँक या समभागांमध्ये घसरण झाल्यास आधार पातळ्यांवर बाजाराचा कल पाहून खरेदीची संधी निश्चितपणाने साधायला हवी. रिअल इस्टेट कंपन्यांमध्ये सुरू असलेली तेजी पाहता ८०० रुपयांच्या आसपास असणारा कॅनफिन होम्सचा समभाग १०५० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. टेक्नॉलॉजी कंपन्यांमधील तेजीची लाट पाहता इन्फोसिसचा समभाग १९०० रुपयांसमीप खरेदी करून २२०० रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल. एबी कॅपिलटचा समभाग १९२ रुपयांना खरेदी करून २२० रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल.

बाजारातील चढउतारांचा वेग लक्षात घेता आणि देश-विदेशात घडणाऱ्या घडामोडींमुळे बाजारावर होणारे परिणाम पाहता आपली जोखीम कमीत कमी ठेवत स्टॉपलॉस टूल्सचा वापर करून दीर्घकालीन गुंतवणुकीला प्राधान्य द्यावे.

◆◆◆

## युपीआयद्वारे कर्ज घेता येणार

● बँकिंग विश्व

स्मॉल फायनान्स बँका किंवा लघुवित्त बँका या प्रामुख्याने क्रेडिट सुविधा शोधणाऱ्या रांगेतील शेवटच्या व्यक्तींना किफायतशीर, तंत्रज्ञानावर आधारित बँकिंगसेवा देण्यासाठी ओळखल्या जातात. या बँका बँकिंग नियमन कायदा, १९४९ अंतर्गत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) द्वारे संचालित केल्या जातात. त्यांना आरबीआयकडून बँकिंगचा परवाना देखील मिळतो. प्रीअप्रूव्हड् क्रेडिट लाईन हे एक आर्थिक उत्पादन असून सामान्य नागरिकांना सहज कर्ज मिळण्यासाठी ते तयार करण्यात आले आहे. याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे याद्वारे ग्राहक त्यांच्या व्यवहाराच्या वेळी पूर्व-मंजूर क्रेडिट वापरू शकतात. उदाहरणार्थ, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर खरेदी करताना, त्यांच्या खात्यातून पैसे देण्याऐवजी, ग्राहक युपीआय ॲपमध्ये उपलब्ध क्रेडिट लाइन निवडू शकतात आणि कोणत्याही अडचणीशिवाय पेमेंट करू शकतात. याद्वारे, सामान्य लोक किंवा लहान व्यावसायिक जे पहिल्यांदाच क्रेडिट वापरत आहेत ते देखील औपचारिक बँकिंगच्या कक्षेत सामील होऊन डिजिटल क्रेडिटच्या सुविधेचा लाभ घेऊ शकतील.

रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाचा सर्वाधिक फायदा गावे, शहरे, छोटी शहरे आणि महानगरांमध्ये राहणाऱ्या लोकांना होणार आहे, जे आतापर्यंत बँकिंग कर्ज प्रणालीचा लाभ घेऊ शकले नव्हते. देशात असे कोट्यवधी लोक आहेत ज्यांना त्यांच्या छोट्या व्यवसायासाठी काही दिवस किंवा आठवडे दररोज थोड्या पैशांची आवश्यकता असते आणि ते यासाठी बँकांना भेट देऊ शकत नाहीत. आरबीआयच्या या निर्णयानंतर असे




लोक आता यूपीआयद्वारे लघु वित्त बँकांकडून कर्ज घेऊ शकतील. यूपीएच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या आर्थिक व्यवहारांमुळे त्यांना मिळालेल्या क्रेडिटवर ही कर्जे त्या लोकांना उपलब्ध होतील. या सुविधेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे गरज असेल तेव्हा लगेच कर्ज उपलब्ध होईल. तुमच्या व्यवसायासाठी वस्तू खरेदी करताना तुम्ही पेमेंट करण्यासाठी या सुविधेचा लाभ घेऊ शकाल.

आरबीआयच्या या निर्णयामुळे भारतीय बाजारपेठेतील 'क्रेडिट सर्कल' वाढेल, ज्याचा थेट फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला होईल.

नाबार्डच्या अहवालानुसार, सुमारे ६०% ग्रामीण कुटुंबे अजूनही 'अनौपचारिक कर्जाच्या स्रोतांवर' अवलंबून आहेत. असंघटित कर्जावरील व्याजदर खूप जास्त आहेत. अहवालानुसार, अनौपचारिक सावकारांकडून आकारले जाणारे व्याजदर साधारणपणे २४% ते ६०% प्रति वर्ष, कर्जदाराच्या गरजेनुसार आणि प्रोफाइलवर अवलंबून असतात. अशी अनौपचारिक कर्जे विश्वास आणि नातेसंबंधांच्या आधारे दिली जातात, यासाठी गरजू व्यक्तीला दीर्घ प्रक्रियेतून जावे लागत नाही, तसेच त्याला फारशी कागदपत्रेही करावी लागत नाहीत. तसेच, औपचारिक कर्ज देणाऱ्या संस्थांच्या विपरीत, अनौपचारिक सावकार अनेकदा कर्ज परतफेडीच्या अटींबाबत लवचिक असले तरी ते कर्जदारांसाठी हिताचे नसतात.

या पार्श्वभूमीवर आरबीआयचा हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना जास्त तांत्रिक ज्ञान किंवा मेहनत करण्याची गरज नाही. तुमच्या युपीआयमध्ये 'क्रेडिट लाइन' पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर तुम्हाला तुमच्या पसंतीची बँक निवडावी लागेल. यानंतर तुम्हाला किती कर्ज मिळू शकते हे कळू शकेल. त्यानंतर तुम्ही तुमचे क्रेडिट लाइन खाते लिंक करून पिन तयार करा आणि या सुविधेचा लाभ घ्या. कर्जाची परतफेड करण्याची पद्धत तुमच्या बँकेने ठरवून दिलेल्या प्रक्रियेनुसार असेल. तुम्ही वेळेवर कर्जाची परतफेड केल्यास, तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारेल आणि तुम्हाला भविष्यात पुन्हा कर्ज घेणे सोपे होईल. ◆◆◆

## सोन्याच्या बारसाठीही हॉलमार्किंगची सक्ती?

केंद्र सरकार सोन्याच्या बारवर हॉलमार्किंग बंधनकारक करण्याच्या शक्यतेवर विचार करीत आहे. त्याचबरोबर ग्राहकांचे हित जपण्यासाठी प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेल्या हिऱ्यांच्या नियमनासाठी एखादी चौकट तयार केली जाण्याची शक्यता असल्याचे ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी सांगितले.

भारतीय उद्योग महासंघाने आयोजित केलेल्या भारतीय दागिने या विषयावरील परिषदेत बोलताना खरे यांनी सांगितले की, दागिने निर्मिती क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. कारण या क्षेत्रातून रोजगार निर्मिती होते.



त्याचबरोबर निर्यात होऊन भारताला परकीय चलन उपलब्ध होते.

भारताने याच दृष्टिकोनातून सोन्याच्या दागिन्याच्या हॉलमार्किंगची मोहीम हाती घेतली आहे. २३ जून २०२१ पासून सोन्याच्या दागिन्यावर हॉलमार्किंग करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आतापर्यंत तब्बल ४० कोटी दागिन्यावर हॉलमार्किंग झाले आहे. यामुळे दागिने खरेदी करताना दागिन्याची ग्राहकांना खात्री मिळते.

आता असाच प्रयोग सोन्याचे बार आणि नाण्यावर करण्याचा प्रयत्न चालू आहे.त्यामुळे गुंतवणूकदारांना सोने खरेदी करताना संधीग्धतेचा सामना करावा लागणार नाही. त्या म्हणाल्या की दागिने उत्पादक अनेकदा सोन्याचे बार खरेदी करतात. त्याचबरोबर या बारची फेरखरेदी होते. त्यामुळे स्त्रोतांतच सोने शुद्ध असल्याची खात्री मिळण्याची आवश्यकता आहे. यासाठी सोन्याच्या बार आणि नाण्यावर हॉलमार्किंग केल्यानंतर हा प्रश्न बऱ्याच प्रमाणात निकाली निघू शकतो.

भारतातील सोन्याच्या दागिन्याची बाजारपेठ २०२३ मध्ये ४४ अब्ज डॉलरची होती. २०३० पर्यंत ही बाजारपेठ वाढून १३४ अब्ज डॉलरची होणार आहे. भारतातून सोन्याच्या दागिन्याची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. एकूण भारतीय निर्यातीत या निर्यातीचा वाटा ३.५% आहे. या क्षेत्राचे महत्त्व ओळखून या क्षेत्राला विस्तारित करण्यासाठी भारत सरकार दागिने उत्पादकाच्या मदतीने अनेक उपाय योजना राबवित आहे. भारतात १.९५ लाख नोंदणीकृत दागिने उत्पादक आहेत. तर १६०० ठिकाणी हॉलमार्किंग केले जाते. ◆◆◆

## युनिफाइड लेंडिंग इंटरफेस : कर्जप्रक्रियेत येणार सुलभता

● माहीत आहे का?


सध्या कर्ज घेण्याची प्रक्रिया खूपच किचकट आहे. यासाठी कर्जदाराला अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. बँकांमध्ये हेलपाटे घालावे लागतात. कर्जदारांची ही अडचण लक्षात घेऊन आता सरकारने ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे ठरवले आहे. भारतीय रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी पेमेंट ॲप युपीआसारखे युनिफाइड लेंडिंग इंटरफेस प्लॅटफॉर्म लॉन्च करण्याची घोषणा केली आहे.

गेल्या वर्षी (ऑगस्ट २०२३), आरबीआयने फ्रिक्शनलेस क्रेडिट म्हणजेच सुलभ कर्ज देण्यासाठी तांत्रिक प्लॅटफॉर्मचा पायलट प्रोजेक्ट सुरू केला होता.

एक वर्षाच्या पथदर्शी प्रकल्पादरम्यान, मध्यवर्ती बँकेने किसान क्रेडिट कार्ड कर्ज, डेअरी कर्ज, चव्वए कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि गृह कर्जावर लक्ष केंद्रित केले, ज्यांना जास्त मागणी आहे.

ग्राहकांना काय फायदा होणार?

आज बाजारात अनेक ॲप्स झटपट कर्ज देण्याचा दावा करताहेत. परंतु, यावर आरबीआयचे नियंत्रण खूपच मर्यादित आहे. या ॲप्सद्वारे अनेकदा ग्राहकांचा, कर्जदारांचा मानसिक छळ केल्याचा आरोप होतो. पण, जर




आरबीआय युएलआय प्लॅटफॉर्मवरील ॲप्सवर थेट नजर ठेवणार असेल तर तेथे अनियमितता निश्चितच कमी होतील. तसेच या व्यासपीठामुळे विशेषतः ग्रामीण आणि लहान ग्राहकांसाठी कर्जाचे मूल्यांकन मोठ्या प्रमाणात सुलभ होईल.

युनिफाइड लेंडिंग इंटरफेसची रचना कर्जप्रक्रियेसाठी लागणारा वेळ आणि कागदी काम कमी करण्यासाठी करण्यात आली आहे. हे ओपन ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (एपीआय) सह ओपन आर्किटेक्चर एकत्र करते. यामुळे, वित्तीय संस्था सहजपणे 'प्लग अँड प्ले' मॉडेलमध्ये समाविष्ट होऊ शकतात.

युएलआय ॲप आधार, ई-केवायसी, राज्य सरकारच्या जमिनीच्या नोंदी, पॅन प्रमाणीकरण आणि अकाउंट ॲग्रीगेटरसह विविध स्त्रोतांकडून डेटा संकलित करेल. ते दुग्ध सहकारी संस्थांकडील दुधाचा डेटा आणि घर किंवा मालमत्ता शोध डेटा यासारख्या सेवांशी देखील जोडले जाईल. यामुळे तुम्ही युपीआयमध्ये ज्याप्रमाणे फक्त तुमचा पिन टाकून पेमेंट करता, त्याच प्रकारे युएलआयमध्ये तुम्ही पात्र असल्यास, तुमचा पिन टाकून तुम्ही कर्ज घेऊ शकता.

युनिफाइड पेमेंट इंटरफेस एप्रिल २०१६ मध्ये लॉंच करण्यात आले. ८ वर्षांच्या प्रवासात युपीआयने डिजिटल पेमेंटचे जग बदलून टाकले. आज सबंध देशभरात पानाच्या दुकानांपासून ते भाजीच्या स्टॉलपर्यंत, तुम्हाला क्युआर कोड स्कॅनर बसवलेले दिसताहेत. इतर अनेक देशांनीही भारताचे युपीआय मॉडेल स्वीकारले आहे. आता या यशाची पुनरावृत्ती करण्यासाठी युएलआयची संकल्पना राबवली जाणार आहे. ◆◆◆

## गुंतवणुकीचा नवा पर्याय

**कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने कोटक ट्रान्स्पोर्टेशन अँड लॉजिस्टिक्स फंड लॉंच केला. ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्स संकल्पनेवर आधारित ही एक ओपन एंडेड इक्विटी स्किम आहे. गुंतवणूकदारांना 'एनएफओ'च्या कालावधीत किमान हजार रुपये आणि त्यानंतर एक रुपयांच्या कितीतरी पटीत रक्कम गुंतवता येणार आहे.**




या फंडमध्ये पैसे गुंतवण्यापूर्वी काही गोष्टी जाणून घ्या.

१) कोटक ट्रान्स्पोर्टेशन अँड लॉजिस्टिक्स फंडचा उद्देश परिवहन, लॉजिस्टिक्स आणि संबंधित उपक्रमात सामील कंपनीच्या शेअरमध्ये गुंतणूक करून चांगला परतावा देणे. प्रामुख्याने गुंतवणुकीतून दीर्घकाळापर्यंत उच्च परतावा मिळवण्याचा उद्देश आहे. या संकल्पनेत ट्रान्स्पोर्टेशन इन्फ्रास्ट्रक्चर, लॉजिस्टिक्स सर्व्हिसेस आणि कुशल सस्टेनेबल ट्रान्स्पोर्टेशनसाठी इनोव्हेटिव्ह काम करणाऱ्या कंपन्यासमवेत व्यवसाय करण्याबरोबरच या सेक्टरमध्ये गुंतवणूक करणाऱ्या आर्थिक कंपन्यांच्या संबंधित व्यावसायिकांचा देखील समावेश आहे. फंडचे प्रमुख वैशिष्ट्ये: वाढती गरज, अपेक्षा या आधारे ट्रान्स्पोर्टेशन (परिवहन) अणि लॉजिस्टिक्स इकोसिस्टिममध्ये वेगाने होणाऱ्या बदलापासून प्रेरणा घेत भारतात वाढत्या परिवहन आणि लॉजिस्टिक्स उद्योगात गुंतवणूक करण्याची संधी देणे. गुंतवणुकीची रणनिती: हा फंड लार्जकॅप, मिडकॅप आणि स्मॉलकॅप कंपन्यांसह वेगवेगळ्या मार्केट कॅपिटायजेशनमध्ये गुंतवणूक करण्याची सुविधा देते.

ग्रोथची शक्यता: ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्स इंडस्ट्री ही भारतमाला, सागरमाला, डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्कसारख्या सरकारी उपक्रमाने विकास करण्यासाठी सज्ज आहे. तंत्रज्ञानाची प्रगती (टेक्नॉलॉजी ॲड्व्हान्समेंट), असंघटितपासून संघटित क्षेत्रापर्यंतचे होणारे बदल आणि मॅन्यूफॅक्चरिंग घडामोडीतील तेजी ही या संकल्पनेला आणखी बळ देण्याचे काम करते. कोटक महिंद्रा असेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश शहा यांच्या मते, कोटक ट्रान्स्पोर्टेशन अँड लॉजिस्टिक्स फंड लॉंच करण्याबरोबरच आम्ही गुंतवणुकदारांना भारतात वेगाने बदलणाऱ्या परिवहन आणि लॉजिस्टिक्सच्या संकल्पनेत गुंतवणूक करण्याची संधी देत आहोत. ही प्रगती वाहन मालकांच्या संख्येत वाढ आणि प्रती व्यक्तीच्या उत्पन्न वाढीतून दिसते. तसेच कोळसा आणि तेल यासारख्या नैसर्गिक इंधनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर या सारख्या बदलासह अनेक घटकांचा लॉजिस्टिक्स आणि ट्रान्स्पोर्टेशन सेक्टरवर प्रभाव आहे. भारतमाला आणि गतीशक्ती सारखे प्रमुख सरकारी उपक्रम, लॉजिस्टिक्सच्या क्षेत्रात व्यापाराची संधी देतील आणि विस्तार करतील. भारतात विकसित मॅन्युफॅक्चरिंग सेक्टरसह ट्रान्स्पोर्टेशन (परिवहन) आणि लॉजिस्टिक्स इंडस्ट्री देखील विस्तारासाठी सज्ज आहे.

६) कोटक महिंद्रा असेट मॅनेजमेंट कंपनीचे अधिकारी हर्ष उपाध्याय यांच्या मते, ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्सची संकल्पना ही वाढती ग्राहकशक्ती, प्रती व्यक्तीचे वाढते उत्पन्न, ई कॉमर्स, ऑटो-ऑटो ॲसिलरी बिझनेसमधील ग्रोथ यासारख्या अनेक फॅक्टरचा लाभ मिळवणारी आहे. एक कुशल लॉजिस्टिक्स नेटवर्क तयार करून ट्रान्स्पोर्टेशनसंबंधी खर्च कमी करण्यावर सरकारकडून दिला जाणारा भर ही बाब केवळ या सेक्टरच्या ग्रोथसाठी मदत करणार नाही तर अनेक कंपन्यांना या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी प्रोत्साहित करेल. गेल्या पाच वर्षांत या सेक्टरमध्ये लिस्टेड कंपन्यांची संख्या ४४ टक्क्यांनी वाढली. आगामी काळात ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्स सेवेच्या मागणीत वाढ होणार आहे. ◆◆◆

## इमर्जन्सी फंड : वित्तीय शहाणपणाचे पाऊल

● म्युच्युअल फंड

**अचानक वैद्यकीय संकट आल्यास पैसे उभे करणे खूप आव्हानात्मक असू शकते, अशा कठीण वेळेसाठी आगाऊ तयारी करणे याला वित्तीय शहाणपण म्हणतात.**



वैद्यकीय आणीबाणीसाठी निधीची व्यवस्था करणे हे बऱ्याचदा कठीण काम असते कारण त्यासाठी ताबडतोब मोठी रक्कम जमा करावी लागते. अशा परिस्थितीत कुटुंबांनी या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आगाऊ तयारी करणे गरजेचे आहे. भारतात वैद्यकीय उपचारांसाठी खर्च खूप जास्त आहे. बहुतेक रुग्णांना कोणतेही वैद्यकीय विमा संरक्षण नसते. वैद्यकीय विमा कवच असले तरी अनेकदा ते प्रचंड खर्च भागवण्यासाठी पुरेसे नसते. पुरेसे वैद्यकीय विमा संरक्षण असलेल्या लोकांनाही त्यांच्या घराजवळ नेटवर्क हॉस्पिटल नसणे यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत त्यांना स्वतःच्या खिशातून पैसे द्यावे लागतात आणि नंतर परतफेड करावी लागते. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या शेवटच्या वार्षिक अहवालानुसार, एकूण नोंदणीकृत ७०,००० कोटी रुपयांच्या आरोग्य विमा दाव्यांपैकी, प्रतिपूर्ती केलेल्या दाव्यांची रक्कम होती सुमारे २८,००० कोटी रुपये. यावरुन अनेक गोष्टींचा अंदाज येऊ शकतो.

वैद्यकीय आपत्ती ओढावल्यास आवश्यक असणारा पैसा उभा करण्यासाठी कर्जाशिवाय पर्याय उरत नाही. बहुतेक वित्तीय संस्था नवीन ग्राहकांसाठीही काही तासांत वैयक्तिक कर्ज प्रक्रिया पूर्ण करतात. पूर्व-मंजूर कर्जे किंवा पगार खात्याशी जोडलेली कर्जे देखील काही मिनिटांत मंजूर केली जाऊ शकतात. पण पर्सनल लोनवरील व्याजदरही जास्त असतात. साधारणपणे, वैयक्तिक कर्जाचे व्याज दर ९.९ ते २०.६ टक्के पर्यंत असतात. परंतु ज्या लोकांचा बँकेशी कोणताही संबंध नाही, म्हणजेच जे कर्ज देणाऱ्या बँकेचे ग्राहक नाहीत, त्यांना वैयक्तिक कर्ज मिळणे कठीण होऊ शकते.

क्रेडिट कार्डद्वारे तुम्हाला लगेच पैसे मिळू शकतात. त्यामुळे रुग्णाला ॲडमिट करताना आवश्यक रकमेसाठी क्रेडिट कार्ड उपयुक्त ठरू शकते. क्रेडिट कार्डवरील व्याजमुक्त कर्जाचा कालावधी ३० ते ५० दिवसांचा असतो. व्याजमुक्त कालावधीनंतर, दर महिन्याला २.५ ते ४ टक्क्यांपर्यंत दंड आकारणी केली जाते. सबब क्रेडिट कार्डचा वापर प्रारंभिक पेमेंटपर्यंत मर्यादित ठेवणे आणि उर्वरित कर्जासाठी सुवर्ण कर्जासारखे पर्याय शोधणे योग्य ठरते. ज्या ग्राहकांना व्याजमुक्त कालावधीनंतरही पेमेंट करण्यासाठी अतिरिक्त वेळ लागतो त्यांनी क्रेडिट कार्ड कर्जाची शिल्लक समान मासिक हप्त्यांमध्ये रूपांतरित करावी. त्यामुळे व्याजाचा खर्च कमी होऊ शकतो. फिनटेक कंपन्या आता सबव्हेंशन मॉडेल अंतर्गत वैद्यकीय कर्ज देतात.हे मॉडेल मोबाईल फोनसारख्या ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी उपलब्ध असलेल्या शून्य टक्के व्याज कर्जासारखे आहे. फिनटेक कंपन्या सहसा पारंपारिक कर्जदात्यांपेक्षा जलद आणि सुलभ अटींवर कर्ज देतात. यामध्ये आयव्हीएफ म्हणजे इन विट्रो फर्टिलायझेशनसारख्या प्रक्रियांसाठी कर्ज देखील समाविष्ट आहे. परंतु अशी कर्जे या संस्थांसोबत भागीदारी असलेल्या रुग्णालयांपुरती मर्यादित आहेत.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेता शेवटच्या क्षणी पैसे उभे करण्याचा ताण टाळण्यासाठी वैद्यकीय आपत्कालीन निधी तयार करणे महत्त्वाचे आहे. सध्याची एकंदरीत महागडी खासगी वैद्यकीय व्यवस्था पाहता व्यक्तीकडे सुमारे १० लाख रुपयांचा निधी असावा. ज्या कुटुंबात वृद्ध सदस्य आहेत त्यांच्यासाठी हे विशेषतः महत्वाचे आहे. ही रक्कम बचत खाते आणि लिक्विड फंडामध्ये विभागली पाहिजे. ◆◆◆

# नगर शहरातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या विरोधात महिला आक्रमक

**भारतीय संस्कृती व सरकारी परिपत्रकांचे पालन न करणाऱ्यांविरोधात आंदोलन : भाजप आघाडी**



भारतीय संस्कृती व केंद्र सरकारच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या शहरातील शाळांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन शहर भाजपच्या महिला आघाडीच्या शिष्टमंडळाने जि.प. शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील यांना दिले

नगर – शहरातील काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून हिंदू सणासुदीच्या दिवसांमध्ये तसेच दैनंदिन विद्यार्थिनींना हातात बांगड्या घालणे, मेहंदी काढण्यास तसेच कपाळावर गंध किंवा टिकली लावण्यास, राखी किंवा गंडा बांधणे आदींबाबत बेकायदेशीरपणे बंधने घालत सक्तीने शिक्षा करत विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक त्रास दिला जात आहे. प्रत्यक्षात केंद्र सरकारने देशातील सर्व शाळांसाठी ३० ऑगस्ट २०२३ रोजी विद्यार्थिनींना याबाबत शारीरिक व मानसिक शिक्षा न करण्याचे परिपत्रक काढले आहे. मात्र शहरातील काही इंग्रजी माध्यमांच्या शाळा त्या परिपत्रकास केराची टोपली दाखवत विद्यार्थिनींना शिक्षा करत पालकांनाही अपमाकारक वागणूक देत मानसिक त्रास देत असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अनेक पालकांच्या तक्रारी आल्या आहेत. भारतात राहून जर भारतीय परंपरा व संस्कृती पाळण्यावर बंदी असेल तर अशा शाळांवर शिक्षण विभागाने कठोर कारवाई करत मान्यता रद्द करावी. केंद्र सरकारचे नियम व आदेश सर्वांना बंधनकारक आहेत. त्याचे जर पालन न झाल्यास शहर भाजपा महिला आघाडी या शाळांच्या विरोधात आंदोलन करेल, असा इशारा शहर भाजपच्या महिला आघाडीच्या शिष्टमंडळाने दिला आहे.

भारतीय संस्कृती व केंद्र सरकारच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या शहरातील शाळांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत आघाडीच्यावतीने जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे, कालिंदी केसकर, ज्योती दांडगे, सविता कोटा, श्वेता पंधाडे, सुरेखा जंगम, रेणुका करंदीकर, गोकुळ काळे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हंटले आहे की, अहिल्यानगर मधील काही इंग्लिश मिडीयम शाळा लहान विद्यार्थी व विद्यार्थिनींवर बेकायदेशीर बंधने घालत आहेत. त्यांचा मानसिक छळ करीत आहेत. भारतीय संस्कृतीनुसार रक्षाबंधन, भाऊबीज, दिवाळी इत्यादी सणांच्या वेळी हातात राखी बांधणे, बांगड्या घालणे, कपाळावर टिळा लावणे, हातात गंडा बांधणे, मेहंदी काढणे इत्यादी गोष्टी मुलं मुली परंपरा म्हणून पाळत असतात. परंतु काही इंग्लिश माध्यमाच्या शाळा अशा गोष्टींना बंदी घालत आहेत. असे कृत्य विद्यार्थ्यांनी केल्यास त्यांना शाळेतून काढण्याची धमकी दिली जाते. टिळा पुसायला लावणे, टिकली काढणे, बांगड्या काढायला लावणे, वर्गाबाहेर उभे करणे अशा पद्धतीची शिक्षा करणे किंवा घरी पाठवणे अशा पद्धतीची अपमानकारक वागणूक दिली जाते. पालकांनी तक्रार केल्यास, 'विद्यार्थ्यांचा दाखला शाळेतून काढून घ्या' असे सांगितले जाते. काही शाळा हिंदू विद्यार्थ्यांना हावभावासहित काही विशिष्ट धर्माची प्रार्थना व गाणी म्हणण्याची सक्ती केली जाते. याबाबत शाळेत विचारणा केली असता, 'आम्ही सरकारचे अनुदान घेत नाही त्यामुळे आमचे नियम विद्यार्थ्यांना पाळावेच लागतील' अशी उत्तरे शालेय प्रशासनाकडून दिली जातात. जरी या शाळा सरकारी अनुदान घेत नसले तरी या शाळा भारतातच असून शाळेला शासनाची मान्यता आहे. त्यामुळे सरकारची परिपत्रके व नियम या शाळांवर बंधनकारकच आहेत.

सावेडीतील ऑक्झेलियम शाळेत गेलो असताना मुलींच्या कपाळावर टिकली किंवा टिळा नसणे, हातात बांगड्या, मेहेंदि नसणे इत्यादी गोष्टी आढळून आल्या. यावेळी मुली व पालकांशी चर्चा करता असे आढळून आले की शाळेत अशा गोष्टींना बंदी आहे. असे उत्तर देतानाचा पालक व विद्यार्थ्यांचा व्हिडीओ काढण्याचा प्रयत्न केला असता पालकांनी तसे न करण्याची विनंती केली. असे केले तर आमच्या पाल्याला शाळेत त्रास दिला जाईल असे सांगितले. भारतात राहून जर भारतीय परंपरा व संस्कृती पाळण्यावर बंदी असेल तर अशा शाळेची मान्यता शासनाने काढून घ्यावी. केंद्र सरकारचे परिपत्रक सर्व शाळांना पाठवून अशा प्रकारची बंदी जर विद्यार्थ्यांवर कोणती शाळा घालत असेल तर शिक्षण विभागाने कठोर कारवाई करत त्या शाळेची मान्यता रद्द करावी, अन्यथा महिला आघाडीला याविरूद्ध आंदोलन करावे लागेल, असा इशारा दिला आहे.

# महापालिकेने विकास कामांची माहिती सोशल मिडियावरून करदात्यांना द्यावी

**सर्व कामांवर माहिती फलक लावावेत : भारतीय जनसंसदेची आयुक्तांकडे मागणी**

नगर – महानगरपालिकेच्या विकास कामांची माहीती सोशल मिडीयावर सर्व कर धारकांना व खाते धारकांना मिळण्याची व्यवस्था करावी तसेच सर्व विकास कामांवर माहिती देणारे फलक लावण्यात यावेत, अशी मागणी भारतीय जनसंसदेने महापालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनातम्हटलेआहेकी,महानगरपालिकेच्या स्वउत्पन्न निधीसाठी महानगरपालिका हद्दीत राहाणारे नागरीक अनेक प्रकारचे कर विकासनिधी महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा करत असतो. या जमा होणाऱ्या कराच्या रक्कमे बरोबरच राज्य सरकार, केंद्र सरकार, आमदार, खासदार निधी विविध कामांसाठी उपलब्ध होते, तसेच विविध योजनांचा निधी उपलब्ध होतो.

महानगरपालिकेचा स्वनिधी व इतर निधी विकास कामांवर खर्च होत असतो हा झालेला खर्च व झालेले विकासकाम हे करदात्यांना समजणे आवश्यक आहे. आपल्या समस्या अडचणी नेमक्या काय आहेत व विकास कामावर नेमका कुठे खर्च होतो हे समजत नाही. त्या करीता प्रत्येक प्रभागामध्ये होणारे सर्व विकास कामांची प्रशासकीय मंजुरी, कार्यारंभ आदेश, बिलप्रत, मोजमाप पुस्तकातील नोंदी देयक रजिस्टर मधील नोंदी इ. बाबत सोशल मिडीयाच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या सर्व खातेधारकांना व नागरीकांना कळविण्यात यावे, या करीता फार मोठया खर्चाची तरतुद करावी लागणार नाही. त्याचा फार मोठा आर्थिक बोजा महानगरपालिकेवर येणार नाही. त्यामुळे सर्व माहीती खातेधारकांना व्हॉटस ॲप ई मेल, मेसेज या व्दारे देण्यात यावी अशी मागणी करीत आहोत.

याबरोबरच महानगरपालिका हददीत होणाऱ्या सर्वच विकास कामांवर त्या कामाचा सविस्तर फलक लावणे बंधनकारक करावे. या कामावर प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मंजुरी, मंजुर अंदाज पत्रक, काम करणाऱ्या एजन्सीचे नांव व पत्ता, कार्यारंभ आदेश दिनांक, पूर्ण करण्याची तारीख व गुणवत्तेची प्रमाणके इ. माहिती होणारे प्रत्येक विकासकाम, दुरुस्तीचे काम, देखभालीचे काम, सेवा पुरविणाऱ्या सर्व कामावर फलक लावणे हे बंधनकारक करावे. या फलकावर कुठल्याही लोकप्रतिनिधीचे नाव असु नये. हे फलक ५ x ४ आकाराचे असुन पक्क्या ऑईल पेंट रंगाने, वाचता येईल अशाा अक्षराच्या आकारात असावेत.

या दोन्हीही मागण्यांची त्वरीत दखल घेऊन अंमलबजावणी करण्यात यावी, अशी विनंती भारतीय जनसंसदचे राज्याध्यक्ष अशोक सब्बन, जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे, रईस शेख, बबलू खोसला, अशोक डाके, सुनिल टाक, प्रकाश गोसावी, अशोक भोसले, कैलास पटारे आदींनी केली आहे.

# एसटी बसमध्ये नजर चुकवून महिलेच्या दागिन्यांची चोरी

नगर – एस टी बसमध्ये चढत असताना गर्दीत सोन्याचे गंठण व सोन्याचा सर तुटल्याने त्याचे मणी गोळा करुन स्कार्प मध्ये बांधुन पर्स मध्ये ठेवलेले असताना अनोळखी महिलेने नजर चुकवून चोरुन नेल्याची घटना शहरातील पुणे बस स्थानकात घडली.

या बाबत आशा दिलीप पोकळे (वय ५०,रा.पोकळे गल्ली, अमळनेर, ता.पाटोदा, जि. बीड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या पुणे येथून नातेवाईकांचे लग्नाचा कार्यक्रम पार पाडून पुणे शेवगाव या एसटी बसने नगरच्या माळीवाडा बसस्थानकात उतरल्या. त्यानंतर गावाकडे जाण्यासाठी पुणे बसस्थानकात गेल्या, तेथे मुंबई पाटोदा एस टी बसमध्ये चढत असताना प्रवाशांच्या गर्दीत त्यांच्या पाठीमागे असलेली अनोळखी प्रवासी महिला हीने त्यांना तुमच्या गळ्यातील सोन्याचा गंठण व सर तुटला असल्याचे सांगितले. त्यांनी लगेच एसटी बसमध्ये पडलेले सोन्याचे मणी जमा करून गंठण व सोन्याचे मणी स्कार्फ मध्ये बांधुन ते पर्समध्ये ठेवले.

त्यानंतर त्या एस टी बसमध्ये प्रवास करत असताना त्यांच्या शेजारी उभी असलेल्या त्याच अनोळखी महिलेने आणखी काही सोन्याचे मणी एसटी बस मध्ये बाजुला पडलेले असल्याचे सांगितले असता पोकळे यांनी त्यांची पर्स सीटवर ठेवली व त्या खाली पडलेले सोन्याचे मणी उचलले व पर्सच्या पुढील कप्प्यात ठेवले. त्यानंतर त्यांनी घरी जाऊन पर्स उघडून पाहिली असता स्कार्प मध्ये बांधुन ठेवलेले एक तोळा वजनाचा सोन्याचा सर, आणि एक तोळा वजनाचे काळ्या मण्यात ओवलेले सोन्याचे गंठण मिळुन न आल्याने त्यांची खात्री झाली की शेजारी उभ्या असलेल्या महिलेनेच पर्स मधील स्कार्प मध्ये ठेवलेले सोन्याचे मणी नजर चुकवून काढून घेतले.

त्यानंतर पोकळे यांनी शनिवारी (दि.७) दुपारी नगरला येत कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मोबाईलमधील अश्लिल फोटो व्हायरल करण्याची धमकी देत नगरमध्ये शिक्षणासाठी राहत असलेल्या युवतीवर अत्याचार

**युवकावर पोक्सो, अत्याचाराचा गुन्हा दाखल, पोलिसांनी केली अटक**

नगर – मोबाईलमध्ये काढलेले अश्लिल फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत युवतीवर वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. मुळची पाटोदा (जि. बीड) तालुक्यातील व सध्या शिक्षणासाठी अहिल्यानगर शहरात राहत असलेल्या पीडित युवतीने रविवारी (दि.८) तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पीडितेच्या फिर्यादीवरून अंमळनेर ता. पाटोदा जि. बीड येथे राहणाऱ्या २२ वर्षीय तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सन २०२२ मध्ये फिर्यादीची आरोपीसोबत ओळख झाल्यानंतर ते एकमेकांशी फोनवरून बोलत होते. त्यावेळी ती अल्पवयीन होती. फिर्यादी राहत असलेल्या नगर शहरातील ठिकाणी येऊन आरोपीने तिच्याशी शारीरिक संबंध केले होते. त्यावेळी त्याने अश्लील फोटोही त्याच्या मोबाईलमध्ये काढले होते. दरम्यान, सदरचा प्रकार फिर्यादीच्या आई–वडिलांना समजल्यानंतर त्यांनी आरोपीच्या घरी जावून त्याला त्याच्या आई–वडिलांसमक्ष समजावून सांगितले होते. त्यानंतर ६ ऑक्टोबर २०२४ रोजी फिर्यादी तिच्या नगरमधील राहत असलेल्या ठिकाणी असताना आरोपी तेथे आला. त्याने त्याच्या मोबाईलमध्ये फिर्यादीसोबतचे अश्लिल फोटो व व्हिडीओ तीला दाखविले व ते व्हायरल करण्याची धमकी देत बळजबरीने शारिरीक संबंध केले. दि.१४ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी फिर्यादी एका मुलासोबत कॉलेजवरून घरी दुचाकीवर येत असताना आरोपीने फिर्यादीच्या बहिणीला व्हिडीओ कॉल करून दुसर्या मुलासोबत फिरत असल्याचे दाखवून बदनामी केली. फिर्यादीच्या वडिलांना मेसेज करून फिर्यादीची बदनामी केली. या सर्व प्रकारानंतर पीडिताने रविवारी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची १५ डिसेंबर रोजी शहरात सभा

नगर – पाच लाखाच्या वरील ठेवी मिळण्यासाठी ठेवीदारांच्या संघटीत शक्तीची गरज आहे. बँकेच्या सत्यस्थितीची तपशीलवार माहिती देण्यासाठी व ठेवीदारांमध्ये नवीन ऊर्जा भरण्यासाठी १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता गायत्री मंदिर, महाजन गल्ली, अहिल्यानगर येथे जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील सर्व ठेवीदारांची सभा आयोजित करण्यात आली आहे. सर्व ठेवीदारांनी सभेस उपस्थित रहावे, असे आवाहन नगर अर्बन बँक बचाव कृती समितीचे डी. एम. कुलकर्णी यांनी केले आहे.

गेल्या बरेच दिवसांपासून ठेवीदारांसाठी बँकेच्या संदर्भातील घडामोडी व हालचाली या थंडावल्या आहेत. पाच लाखाचे आतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवरकमा प्राप्त झाल्या त्यापैकी कोणाही ठेवीदारांकडून संघर्ष समितीला रक्कम प्राप्त झाल्याची माहिती देण्याची तसदी घ्यावी वाटली नाही. त्या ठेवीदारांना ठेवी मिळवून देणे कामी समितीने अथक संघर्ष व प्रयत्न केले. समितीचे त्यात मोठे योगदान होते याचा त्यांना पडलेला विसर यामुळे समितीचे सदस्य व कार्यकर्ते नाराज झाले आहेत.

बँकेचे अवसायक गायकवाड यांच्या मातोश्रींचे निधन झाल्यामुळे त्यांचे जवळपास दोन अडीच महिने बँकेत नियमित येणे झाले नाही. त्यामुळे बँकेच्या वसुलीवर मोठा परिणाम झाला. वसुली थंडावली. परीणामी ठेवीदारांना देण्यासाठी बँकेकडे पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही. मध्यंतरी काही ठेवीदारांनी त्यांच्या ठेव रकमा मिळण्यासाठी अवसायक यांची भेट घेऊन त्यांच्याकडे ठेवीच्या रकमांची मागणी करतांना अकारण अकांडतांडव करून त्यांच्याशी अवमानीत करणारी अर्वाच्य भाषा वापरून वाद घातला. त्यामुळे अवसायकही नाराज झाले. त्या ठेवीदारांनी संघर्ष समितीला न्यायालयीन खर्चासाठी व इतर खर्चासाठी लाखो रूपयांची व्यवस्था करणारी राजाभाऊ चोपडा व राजेंद्र गांधी यांचेवरही अयोग्य आरोप करून त्यांनाही अवमानकारक भाषा वापरून अपमानित केले आहे. मलाही अवमानित केल्यामुळे यापुढे ठेवीदारांसाठी कामे न करण्याच्या मनस्थितीत आम्ही आहोत.

मधल्या काळात विधानसभा निवडणुका व इतर अन्य कामांमुळे पोलीसदलांकडून बँकेच्या घोटाळ्याकडे दुर्लक्ष झाले तसेच जप्त केलेल्या प्रॉपर्टीची लिलाव प्रक्रियाही पूर्णपणे दुर्लक्षित झाली.ठेवीदारांनी बँकेच्या संघर्ष समितीकडे पाठ फिरवल्याने ठेवीदारांच्या दृष्टीने हालचाली थंडावल्या असल्याचे कुलकर्णी यांनी म्हटले आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी १५ डिसेंबरला सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



झेंडीगेट येथील कत्तलखान्यावर छापा टाकून पकडलेल्या मुद्देमालासह कोतवाली पोलिसांचे पथक.



झेंडीगेट येथील कत्तलखान्यावर छापा टाकून पकडलेल्या आरोपी व मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# नगरच्या कत्तलखान्यांमध्ये सर्रासपणे सुरु आहे गोवंशीय जनावरांची कत्तल

**पोलिसांच्या एकाच दिवशी ५ ठिकाणी कारवाया, मोठ्या प्रमाणावर गोमांस जप्त**

नगर – राज्यात गोवंशीय जातीच्या जनावरांची कत्तल करण्यास बंदी असताना नगर शहरासह जिल्ह्यात असलेल्या कत्तलखान्यांमध्ये सर्रासपणे दररोज मोठ्या प्रमाणावर गोवंशीय जनावरांची कत्तल सुरु आहे. पोलिसांनी वारंवार कारवाया करूनही हे बेकायदेशीर कत्तलखाने सुरूच असल्याचे समोर आले आहे. नगरमध्ये पोलिसांनी रविवारी (दि.८) पहाटेपासून मध्यरात्री पर्यंत धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणावर गोमांस जप्त केले असून कत्तलीसाठी आणलेल्या अनेक जनावरांची सुटका केली आहे.

पोलिस अधिक्षक राकेश ओला यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने एका ठिकाणी, कोतवाली पोलिसांनी २ ठिकाणी, एमआयडीसी पोलिसांनी एका ठिकाणी तर श्रीगोंदा पोलिसांनी एका ठिकाणी कारवाई केली आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेने झेंडीगेट येथे पहाटेच टाकला छापा

झेंडीगेट येथील कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रविवारी पहाटे छापेमारी केली. गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या चौघांना ताब्यात घेतले. तर तिघ पळून गेले आहेत. या कारवाईत ३ लाख २६ हजार रुपये किमतीचे १ हजार ६३० किलो गोमांस, १ लाख २ हजारांची सहा जनावरे, लोखंडी सत्तुर व वाहन (क्र. एमएच १६ सीसी ९४१०) असा एकुण ९ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी सात जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्तमश अब्दुल कुरेशी (वय २५, रा. व्यापारी मोहल्ला, रा. झेंडीगेट), इरफान सय्यद मोहम्मद हनीफ (वय ३०, रा. कोठला, झेंडीगेट), अरकान असीफ कुरेशी (वय २३, रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट), अश्रफ शौकत खान (वय २६, रा. झेंडीगेट) यांना ताब्यात घेतले असून फैजान इद्रीस कुरेशी, सुफियान उर्फ कल्लु इद्रीस कुरेशी व शोएब अब्दुल रऊफ कुरेशी हे पसार झाले आहेत.

पो.नि. दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हेतील पोलीस अंमलदार संतोष लोढे, गणेश लोंढे, विजय ठोंबरे, संदीप दरंदले, शिवाजी ढाकणे, रणजीत जाधव, जालींदर माने व विशाल तनपुरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## कोतवाली पोलिसांनी २ ठिकाणी केले २ हजार ३३० किलो गोमांस जप्त

कोतवाली पोलिसांनी झेंडीगेट परिसरातील कारी मशीद व कुरेशी मस्जिद जवळील २ कत्तलखान्यावर छापा टाकत २ हजार ३३० किलो गोमांससह ६ लाख ८६ हजार ३३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई रविवारी (दि.८)दुपारी ३.१० वाजता व रात्री ११.१० वाजता करण्यात आली.

कोतवाली पोलिसांना दुपारी माहिती मिळाली की, झेंडीगेट परिसरातील कारी मज्जिद शेजारी असलेल्या पत्र्याचे शेडमध्ये गोवंश जातीचे जनावरांचे मांस विक्री होत आहे. अशी माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन छापा घातला असता सलिम मुसा शेख (वय–२६, रा. हुसेनी मज्जिद जवळ बारा इमाम कोठला) गोमांस विक्री करताना आढळून आला. तेथे २६ हजार रुपये किमतीचे १३० किलो गोमांस, एक लोखंडी तराजू, एक किलो ग्रॅम वजनाचे लोखंडाचे माप, सत्तूर असा मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त केला.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना रात्री पुन्हा गोपनीय माहिती मिळाली की, झेंडीगेट येथील कुरेशी मज्जिद शेजारी, आर आर बेकरी समोर बेपारी मोहल्ला येथे एका बंद वाडग्यामध्ये गोवंशीय जातीच्या जनावरांची कत्तल होत आहे. ही माहिती मिळताच त्यांनी स.पो.नि.योगीता कोकाटे, पो.हे.कॉ. इनामदार, संभाजी कोतकर, पो.कॉ.तानाजी पवार, दिपक रोहकले, सुरज कदम, लोळगे, सुजय हिवाळे यांच्या पथकाला कारवाई साठी पाठविले. या पथकाने रात्री ११.१० वाजता सदर ठिकाणी छापा टाकून अब्दुल हक फकीर मोहंमद कुरेशी उर्फ काका (वय ५२), नफिस कुरेशी वय २७, दोघे रा. कुरेशी मोहल्ला, आर. आर बेकरी समोर झेंडीगेट) यांना पकडले.

या ठिकाणी पोलिसांनी ६ लाख ६० हजार रुपये किंमतीचे २ हजार २०० किलो गोमांस, एक लोखंडी तराजू, एक किलो ग्रॅम वजनाचे लोखंडाचे माप, सत्तुर असा मुद्देमाल जप्त करुन दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या विरुद्ध पो.कॉ. सुरज कदम यांच्या फिर्यादीवरुन भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९७६ चे कलम ५ (क) ९ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## एमआयडीसी पोलिसांची नागापूरमध्ये कारवाई

एमआयडीसी पोलिसांनी रविवारी (दि.८) दुपारी ४ च्या सुमारास नागापूर गावठाण येथे एका पत्र्याच्या टपरीत छापा टाकत ४ हजार ८०० रुपये किमतीचे ३० किलो गोमांस जप्त केले आहे. या ठिकाणी गोमांस विक्री करणाऱ्या वसीम कदीर कुरेशी (रा.हमालवाडा, झेंडीगेट) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पो.कॉ. सुरेश सानप यांनी फिर्याद दिली आहे. एमआयडीसीचे स.पो.नि. माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने ही कारवाई केली.

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ११ जनावरांची सुटका

कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या १ लाख ५८ हजार रुपये किंमतीच्या ११ जनावरांची श्रीगोंदा पोलिसांच्या पथकाने सुटका केली आहे. श्रीगोंदा शहरात कुकडी कॅनॉलच्या कडेला रविवारी (दि.८) पहाटे २.३० च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी रियाज कुरेशी, फैय्याज कुरेशी (दोघे रा. श्रीगोंदा) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्षपदी अजीम खान यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र पक्षाचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शहर जिल्हा अध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे अल्पसंख्यांक शहर जिल्हा अध्यक्षपदी अजीम खान यांची नियुक्ती



नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्षपदी अजीम खान यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र पक्षाचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शहर जिल्हा अध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले व यावेळी सत्कार करण्यात आला.

सुशांत म्हस्के म्हणाले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालत आहे. सर्व जाती–धर्माला बरोबर घेऊन कार्य सुरु असून, जातीयवादी शक्तीच्या विरोधात पक्ष उभा असून सामान्य नागरिकांच्या विविध प्रश्न सोडवण्यासाठी पक्ष उभा असल्याची भावना व्यक्त केली.

